रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १९८
www.ramprahar.com

◆ बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

भंगारात गेलेले पाच तोळे सोने सापडले सुरक्षित/२
भाजपच्या उमेदवारांची प्रचारात जोरदार आघाडी/६
पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्राचा दबदबा/८

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर गॅस टँकर उलटून वाहतूक ठप्प



**खोपोली** : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आडोशी बोगद्याजवळ अत्यंत ज्वलनशील प्रोपलेन गॅस वाहतूक करणारा टँकर उलटल्याची घटना मंगळवारी (दि. ३) सायंकाळी घडली. या अपघातानंतर टँकरमधून गॅस गळती सुरू झाल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव मुंबईकडे येणारी वाहतूक पूर्णतः थांबविण्यात आली. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. हा टँकर पुण्याहून मुंबईच्या दिशेने जात होता. गॅस गळतीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, आयआरबी महामार्ग पोलीस, देवदूत यंत्रणा तसेच हेल्प फाऊंडेशनची आपत्कालीन पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. खोपोली येथील अग्निशमन दलाचे जवानही घटनास्थळी पोहचले. गॅस गळतीवर नियंत्रण मिळविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते.

# पायाभूत सुविधा, औद्योगिक विकासासाठी आवश्यक भूसंपादन गतीने पूर्ण करा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पायाभूत सुविधा तसेच औद्योगिक विकासासाठी भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी, प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. ३) दिले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

या बैठकीस उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलरासु, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

राज्यात औद्योगिक विकासासाठी विविध विभागांमध्ये एकूण ८,९६९ एकर क्षेत्र उपलब्ध असून नव्याने २०,४३१ एकर जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या संदर्भात मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी मोठी मागणी येत असून उद्योजकांना लागणाऱ्या जागेचा विचार करून एमआयडीसीने एक लाख एकर जागा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. मुंबई, पुणे, नागपूरबरोबरच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी भागांमध्ये गुंतवणूकदारांकडून जमिनीची मागणी वाढत आहे. या दृष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या कामांना गती द्यावी. यासाठी शासन स्तरावरून सहाय्य करण्यात येईल.

राज्यात सुरू असलेले सर्व प्रकल्प येत्या तीन वर्षात पूर्ण होतील असे नियोजन करावे. यासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. त्याचबरोबर वनक्षेत्र नसलेल्या जास्तीत जास्त सलग जागेचे भूसंपादन करून ती उद्योजकांना उपलब्ध करून द्यावीत. याशिवाय विविध विभागांकडील शासकीय जमिनी औद्योगिक वापरासाठी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करावा, यामुळे उद्योजकांना कमी दरात भूखंड उपलब्ध होऊन औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

### विविध प्रकल्पांचा आढावा

*विविध जिल्ह्यातील एमआयडीसीच्या भूसंपादनाबरोबरच एमएसआरडीसीकडील शक्तिपीठ एक्स्प्रेस वे, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नागपूर-गोंदिया एक्स्प्रेस वे, भंडारा-गडचिरोली एक्स्प्रेस वे, नागपूर-चंद्रपूर एक्स्प्रेस वे, नवेगाव-सुरजागड मिनरल कॉरिडॉर, जालना-नांदेड एक्स्प्रेस वे आदी प्रकल्पांच्या सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेचा मुख्यमंत्र्यांनी या वेळी आढावा घेतला. एमआयडीसी आणि एमएसआरडीसीच्या वतीने विविध ठिकाणी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.*

# केंद्रीय अर्थसंकल्प वेगवान विकासाला नवी दिशा देणारा -आमदार निरंजन डावखरे




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा भारताच्या वेगवान विकासाला नवी दिशा देणारा आणि सर्वसमावेशक प्रगतीचा स्पष्ट आराखडा मांडणारा अर्थसंकल्प आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या दूरदृष्टीतून सादर झालेला हा अर्थसंकल्प देशाच्या आर्थिक परिवर्तनाचा मजबूत पाया ठरणार असून विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे, असे प्रतिपादन अर्थसंकल्प कोकण संयोजक तथा आमदार निरंजन डावखरे यांनी मंगळवारी (दि. ३) पनवेल येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी रोजी मोदी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. ना. सीतारामन यांचा यंदाचा सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प होता. अर्थसंकल्पासह त्यांनी विक्रम प्रस्थापित केला आहे. देशाचा अर्थसंकल्प सलग नवव्यांदा सादर करण्याचा विक्रम करणाऱ्या त्या जगातील पहिल्या महिला अर्थमंत्री ठरल्या आहेत, असे आमदार डावखरे यांनी या वेळी नमूद करून पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांचे अभिनंदन केले.

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला भाजपचे सरचिटणीस व पनवेल महापालिकेतील महायुतीचे गटनेते नितीन पाटील, अर्थसंकल्प उत्तर रायगड संयोजक व भाजपचे जिल्हा सरचिटणीस नगरसेवक अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, सरचिटणीस दीपक बेहेरे, भाजप नेते अनिल कौशिक, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, ओवळे ग्रामपंचायतीचे सरपंच राकेश गायकवाड, कामगार नेते रवींद्र नाईक, युवा मोर्चाचे कामोठे अध्यक्ष तेजस जाधव आदी उपस्थित होते.

आमदार निरंजन डावखरे यांनी पत्रकारांना पुढे माहिती देताना सांगितले की, या अर्थसंकल्पात एफडीआयच्या माध्यमातून सेमीकंडक्टर, फार्मा, इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या उच्च तंत्रज्ञान उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे देशभरात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून युवकांसाठी नव्या संधींचे दरवाजे खुले होणार आहेत. केवळ टेक्नॉलॉजी ड्रिव्हन विकास नव्हे, तर हँडलूम क्षेत्रातील कारागीर, पारंपरिक उद्योग आणि स्थानिक उद्योजक यांनाही मुख्य प्रवाहात आणण्याचा समावेशक दृष्टिकोन या बजेटमध्ये स्पष्टपणे दिसून येतो.

महाराष्ट्र आणि कोकण विभागासाठी करण्यात आलेल्या घोषणा विशेष महत्त्वाच्या आहेत. कोकणातील नारळ व काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रक्रिया उद्योग, मार्केटिंग आणि उत्पादनवाढीवर आधारित प्रोत्साहन योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी ठरेल. भिवंडी, इचलकरंजी, पुणे आणि नाशिकसारख्या पारंपरिक औद्योगिक क्लस्टर्सच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय रोजगारनिर्मिती आणि निर्यात वाढीसाठी निर्णायक ठरेल. मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद हाय-स्पीड रेल कॉरिडोरमुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि आर्थिक गतीला मोठी चालना मिळणार आहे. त्याचबरोबर मुंबई येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (आयआयसीटी)चे मुख्य केंद्र स्थापन केल्याने निमेशन, गेमिंग, कॉमिक्स व एव्हीजीसी क्षेत्रात मुंबईला जागतिक ओळख मिळणार आहे. ऑरेंज इकॉनॉमी अंतर्गत १५ हजार शाळा आणि ५०० महाविद्यालयांत कंटेंट क्रिएटर लॅब्स सुरू होणार आहे. यामुळे एमएमआर विभागासह महाराष्ट्र राज्यालादेखील फायदा मिळणार आहे. याद्वारे मुंबईला या नव्या डिजिटल अर्थव्यवस्थेची राजधानी बनवण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय यामुळे अत्यंत स्वागतार्ह आहे. **(पान २ वर..)**

### विकासाचे ग्रोथ इंजिन -आमदार महेश बालदी

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या दूरदृष्टीतून सादर झालेला हा अर्थसंकल्प विकसित भारताचा ग्रोथ इंजिन ठरणार आहे, असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले. आपल्या येथे असलेल्या अटल सेतू, विमानतळ व आगामी प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विमानतळाच्या रोजगार संधीमध्ये २७ गावातील प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात आले. या ठिकाणी जगातील सर्वोत्कृष्ट पाच विद्यापीठे येत आहेत. एज्युसिटी, स्पोर्टसिटी व मेडिसिटीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात विकासात्मक घडणार आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेण येथे ग्रोथ सेंटर उभारणीची घोषणा केली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या विकासावर मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रित करण्यात आले असून हा अर्थसंकल्प देशाच्या विकासाचे आणखी एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, असेही ते म्हणाले.

## निवडक

### सी-टीईटी परीक्षेसाठी शिक्षकांना निवडणुकीच्या कर्तव्यातून सूट

**मुंबई** : सी-टीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांसाठी दिलासादायक बातमी हाती आली आहे. सी-टीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या कर्तव्यातून सूट देण्यात आली आहे. मतदान तारखेत बदल करण्यात आल्याने ५ फेब्रुवारीऐवजी आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी काही शिक्षकांची सी-टीईटी परीक्षा असल्याने त्यांना निवडणूक ड्युटीतून मुक्त करून पर्यायी व्यवस्था करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

### व्हीएसआर व्हेंचर विमान कंपनीच्या ऑडिटचे आदेश

**नवी दिल्ली** : महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर या घटनेच्या तपासाला गती देण्यात आली आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) उपमुख्यमंत्री पवार ज्या कंपनीच्या विमानाने प्रवास करत होते त्या व्हीएसआर व्हेंचर्सच्या विशेष ऑडिटचे आदेश दिले आहेत. त्याचा अहवाल १५ फेब्रुवारीपर्यंत सादर करणे अपेक्षित आहे.

# नवी मुंबईतील तरुणीची लोणावळ्यात आत्महत्या

### चारशे फूट दरीत आढळला मृतदेह

**खालापूर : प्रतिनिधी**

एलएलबीचे शिक्षण घेणाऱ्या नवी मुंबईतील २० वर्षीय तरुणीने लोणावळ्यातील टायगर पॉईंट येथून अंदाजे ४०० फूट खोल दरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. श्रेया नरेंद्र पटी असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. कौटुंबिक वादातून तिने टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.



श्रेया ३१ जानेवारी रोजी ट्रेकिंगला जात आहे असे सांगून घरातून बाहेर पडली होती. सकाळी ११ वाजताच्या सुमारास ती लोणावळ्यात पोहचली. सुरुवातीला ती ड्युक्स नोज येथे गेली. काही वेळानंतर ती खाली उतरली आणि रिक्षाने टायगर पॉईंट येथे गेली. तेथील एका स्टॉलच्या पाठीमागे तिने आपली बॅग ठेवली.

टायगर पॉईंट परिसरात कठड्याजवळ असलेल्या तुटलेल्या तारेच्या कुंपणातून श्रेयाने थेट चारशे फूट खोल दरीत उडी घेतली. सायंकाळपर्यंत श्रेया घरी परत न आल्याने कुटुंबियांनी तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र तिचा मोबाईल बंद होता.

दरम्यान, काही वेळाने स्टॉलच्या पाठीमागे ठेवलेली बॅग दुकानदाराच्या लक्षात आली. बॅगेतील ओळखपत्रावर असलेल्या मोबाईल क्रमांकावर फोन करुन त्याने माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीय रात्री उशिरापर्यंत लोणावळ्यात दाखल झाले.

बॅगेतील कपड्यांच्या आधारे डॉग स्क्वॉडने ज्या ठिकाणाहून तिने उडी घेतली त्या ठिकाणापर्यंत पोलिसांना नेले. टायगर पॉईंट परिसर अत्यंत खोल व दुर्गम असल्याने शोधकार्य आव्हानात्मक होते. दुसऱ्या दिवशी ड्रोनच्या सहाय्याने शोधमोहीम राबवण्यात आली. रेस्क्यू टीमही शोधात सहभागी झाली होती.

अखेर १ फेब्रुवारी रोजी ३६ तासांहून अधिक काळ चाललेल्या शोधमोहीमेनंतर श्रेयाचा मृतदेह खोल दरीत आढळून आला. वॉकी-टॉकीच्या संपर्कात राहून पाच ते सहा तासांच्या अथक प्रयत्नांनंतर मृतदेह वर काढण्यात आला.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडे पुणे, बीड जिल्ह्याचे पालकत्व

**मुंबई : प्रतिनिधी**



बारामती येथे विमान दुर्घटनेत अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर उपमुख्यमंत्रिपदाची धुरा त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर देण्यात आली. त्यानंतर आता पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रीपदही त्यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. याबाबतचा अधिकृत आदेश मंगळवारी (दि. ३) काढण्यात आला.

अजित पवार यांच्या पश्चात सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्री म्हणून राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्याक आणि औकाफ तसेच क्रीडा युवक कल्याण ही खाती देण्यात आली. दरम्यान, अजित पवार हे पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्री होते. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर या जिल्ह्यांचे पालकत्व कोणाकडे जाणार याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू होती. अपेक्षेप्रमाणे दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आले आहे. यामुळे स्व. अजित पवार यांच्याकडे असलेल्या जबाबदाऱ्या पुढे नेण्याची भूमिका आता सुनेत्रा पवार पार पाडणार आहेत.

## राहुल गांधींच्या भाषणावरून लोकसभेत पुन्हा गोंधळ

### कागद भिरकवणाऱ्या आठ खासदारांचे निलंबन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. या वेळी त्यांना रोखण्यात आल्याने विरोधी पक्षाच्या खासदारांनी गदारोळ केला. अध्यक्षांवर कागदपत्रेही फेकण्यात आली. यावरून काँग्रेससह विरोधी पक्षांच्या आठ खासदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

लोकसभेत मंगळवारी (दि. ३) विविध मुद्द्यांवर चर्चा सुरू असताना विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अचानक गोंधळ घालण्यास सुरुवात केली. विरोधी पक्षाचे खासदार सभापतींच्या आसनाजवळ आले आणि त्यांनी कागद भिरकावले. त्यामुळे सभापतींनी कारवाई करीत ३ वाजेपर्यंत संसद सत्र स्थगित केले.



यानंतर लोकसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी ज्या सदस्यांनी पेपर भिरकावले त्यांना बाकी सत्रासाठी निलंबित करण्याचा प्रस्ताव ठेवला. हा प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला. निलंबित केलेल्या खासदारांमध्ये काँग्रेसचे माणिकम टागोर, किरण कुमार रेड्डी, प्रशांत पडोले, हिबी एडन, डीन कुरिया कोसे, गुरजीत सिंग औजला आणि अमरेंद्र सिंग राजा वारिंग आणि माकपचे एस. वेंकटेशन यांचा समावेश आहे. अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

# रायगडात उमेदवारांचा डिजिटल प्रचार

### सोशल मीडियाचा प्रभावी वापर

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचा प्रचार आता शिगेला पोहचला आहे. त्यामुळे जिल्ह्याचे राजकीय वातावरण तापलेय. निवडणुका गावच्या, पण प्रचार हायटेक अशी परिस्थिती दिसून येत आहे.

यंदा निवडणुकीत सोशल मीडियाचा वापर अधिक प्रभावीपणे होताना दिसत आहे. व्हॉट्सअ‍ॅप, इन्स्टाग्राम आणि फेसबुकच्या माध्यमातून रॅली, दौरे तसेच विकासकामांचा डिजिटल प्रचार करून मतदारांना साकडे घातले जात आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ गटांमध्ये १७३ उमेदवार आणि १५ पंचायत समित्यांमधील ३२९ उमेदवार रिंगणात आहेत. ७ तारखेला मतदान होत असल्याने प्रचारासाठी अवघे काही



दिवस उरले आहेत. सर्व मतदारांपर्यंत प्रत्यक्ष पोहचणे अशक्य असल्याने उमेदवारांनी डिजिटल बॅनर आणि व्हिडीओंचा आधार घेतला आहे. सत्तेत असताना केलेली कामे, राबवलेल्या योजना आणि भविष्यातील अजेंडा सोशल मीडियावर झळकत आहे.

विशेष म्हणजे निवडणुकीच्या नियोजनासाठी विविध पक्षांनी कार्यकर्त्यांचे तात्पुरते व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप तयार केले आहेत. प्रत्यक्ष बैठकी घेण्यापेक्षा या ग्रुपवर सभा आणि भेटीगाटींचे नियोजन करणे अधिक सोपे झाले आहे. यामुळे वेळ आणि खर्चाची मोठी बचत होत आहे. गावखेड्यात इंटरनेट सुविधा पोहचल्याने स्मार्टफोनचा वापर वाढला आहे. तरुण मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी आणि आपला अजेंडा प्रभावीपणे मांडण्यासाठी सोशल मीडियाचा वापर खुबीने केला जात आहे.

दरम्यान, मुंबई, पुणे, ठाणे यांसारख्या शहरांत कामानिमित्त गेलेले मतदार निवडणुकीत निर्णायक ठरतात. या मतदारांच्या सातत्याने संपर्कात राहण्यासाठी सोशल मीडिया हे उत्तम साधन ठरत आहे. त्यांना शुभेच्छा संदेश पाठवणे आणि गावाची ओढ निर्माण करून मतदानासाठी बोलावणे यावर उमेदवारांनी लक्ष केंद्रित केले आहे.



## मंत्री पंकजा मुंडेंच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

राज्याच्या मंत्री तथा भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्याचे मंगळवारी (दि. ३) येथे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांचे उड्डाण काही काळ येथे रखडले. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारार्थ सोमवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये आलेल्या मंत्री मुंडे मुक्कामी होत्या. त्या मंगळवारी निघण्याच्या तयारीत असताना हेलिकॉप्टरमध्ये बिघाड असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर दुसरे हेलिकॉप्टर मागवण्यात आले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थिनींनी निबंध स्पर्धा आणि भेट कार्ड बनवणे या स्पर्धांमध्ये यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले.

या स्पर्धांचे आयोजन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात करण्यात आले होते. विविध विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठेची विद्यार्थिनी बिंदू रणजित चौटेले हिने भेटकार्ड स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला, तर लावण्या संदीप झुंझारराव हिने निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दरम्यान, विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनीही विद्यार्थिनींचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यार्थिनींना प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका सारिका लांजूडकर, नेहा खन्ना तसेच मिनल नाईक, तन्वी सबनीस, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही अभिनंदन केले.

# महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली करार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक आहे. गोदरेज ग्रोव्हेटसोबतचा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या राज्य शासनाच्या कटिबद्धतेचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गोदरेज ग्रोव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम–उमेद) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील पाच हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेती पद्धतींचे




प्रशिक्षण मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी हे आपल्या राज्याचा कणा आहेत. हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असून, त्यातील अनेक कुटुंबांचे नेतृत्व कर्तृत्ववान महिला करत आहेत. अशा शेतकऱ्यांना सुलभ कर्ज आणि आवश्यक मदत वेळेवर मिळावी यासाठी शासन कटिबद्ध आहे.

या पार्श्वभूमीवर गोदरेज ग्रोव्हेटसोबतची भागीदारी ही शाश्वत कृषी पद्धती आणि लैंगिक समावेशनाबाबत आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषतः महिला शेतकरी आत्मनिर्भर बनून राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देतील, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती पद्धती, बाजारपेठेतील संधी आणि माहितीपूर्ण निर्णयक्षमतेस सक्षम करून, हा उपक्रम महाराष्ट्रातील शेती उत्पादनक्षमता, उपजीविका आणि ग्रामीण टिकाऊपणा यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधण्याचा यशस्वी प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

या कराराअंतर्गत एमएसआरएलएम–उमेदकडून स्वयंसहायता गट व कृषी सखी नेटवर्कद्वारे महिला शेतकऱ्यांचे संघटन व समन्वय साधला जाणार आहे. तर गोदरेज ग्रोव्हेटकडून प्रशिक्षण कार्यशाळा, प्रात्यक्षिक शेतजमिनी, शेतकरी क्षेत्रशाळा व सुरक्षितता किट्स पुरवण्यात येणार आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत, गोदरेज ग्रोवेट आणि एमएसआरएलएम उमेद संयुक्तपणे जीएपी, आपीएम आणि सुरक्षितता पद्धतींवरील प्रशिक्षण कार्यशाळा, शेतकरी क्षेत्रीय शाळा, प्रात्यक्षिक प्लॉट्स आणि सुरक्षितता किट्सचे वितरण करणार आहेत.

संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर हा तीन वर्षांचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या अंतर्गत महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन याबाबत प्रशिक्षण देण्यात येईल, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. ५० हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला आणि १०० स्वयंसहायता गट यांना उपक्रमाचा लाभ मिळणार आहे.


# स्थानिक स्वराज्य संस्थांनी एमआयडीसीचे पाण्याचे १७६ कोटी रुपये थकवले

## अलिबाग नगरपालिकेने थकवले ३१ कोटी ९७ लाख रुपये

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ग्रामपंचायतीकडून थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी तगादा लावला जात असतानाच अलिबाग नगरपालिका, जिल्हा परिषद आणि अनेक ग्रामपंचायतींनी एमआयडीसीची १७६ कोटींहून अधिक रुपयांची पाणीपट्टी थकविल्याची बाब समोर आली. परिणामी पाणीपुरवठा बंद होण्याची भीती व्यक्त होत आहे. सर्वात मोठी थकबाकी अलिबाग नगर परिषदेची आहे. १९९६ पासून अलिबाग नगरपरिषदेसाठी जीवन प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा होत आहे. त्या वेळेपासून एमआयडीसीला देय असलेली रक्कम थकीत राहिली आहे. त्याचबरोबर अलिबाग तालुक्यातील ६० टक्के ग्रामपंचायतींना एमआयडीसीकडून पाणीपुरवठा केला जातो. या ग्रामपंचायतींकडून थकीत रक्कम वाढत चालली आहे.

अलिबागमधील औद्योगिक कंपन्यांना पाणीपुरवठा केल्यानंतर उरणारे पाणी शहर आणि गावांना उपलब्ध करून दिले जात असते. यासाठी ठरावीक रक्कम एमआयडीसी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पाणी बिलांच्या स्वरूपात



आकारणी करते, मात्र ही रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांकडून वेळेवर भरली जात नसल्याची बाब आता समोर आली आहे. अलिबाग नगरपालिकेसह ४० ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषद यांच्याकडून १७६ कोटी रुपये एमआयडीसीला येणे बाकी आहे. वारंवार पाठपुरावा करूनही पाणी बिलांच्या थकबाकीची रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांकडून भरली जात नसल्याची बाबही यानिमित्ताने समोर आली आहे. पाणीपट्टीची रक्कम मोठी असल्याने याची आता चर्चा होऊ लागली आहे.

कोट्यवधींची थकबाकी असलेल्या ग्रामपंचायती आणि नगरपालिका पोयनाड, वेश्वी, थळ, चेंढरे, आंबेपूर, सोगाव, कामार्ले, चरी, कुरुळ, खंडाळे, नागोठणे, शहाबाज या प्रमुख ग्रामपंचायतींसह अलिबाग नगरपालिकेला एमआयडीसीकडून पाणीपुरवठा केला जातो. आम्ही थकबाकी वसुलीसाठी ग्रामपंचायती, नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाठपुरावा करीत आहोत, पण प्रतिसाद मिळत नसल्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपकार्यकारी अभियंता सुभाष कुंभार यांनी सांगितले, तर अलिबाग नगरपालिकेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अलिबाग नगरपालिकेची एमआयडीसीला देय असलेली रक्कम फार पूर्वीपासूनची आहे. त्यावर व्याज वाढत गेल्याने ही रक्कम वाढत गेली; परंतु अलीकडच्या कालावधीत दर महिन्याला जी रक्कम आकारली जाते, ती नियमित भरली जाते.

**थकबाकीदार**

* अलिबाग नगरपालिका : ३१ कोटी ९७ लाख
* महाराष्ट्र जीवन प्राधिकरण : ४२ कोटी चार लाख,
* जिल्हा परिषद : १५ कोटी ५० लाख ३६
* ग्रामपंचायती झ ८५ कोटी ४४ लाख
* सार्वजनिक बांधकाम : ९० लाख

# भंगारात गेलेले पाच तोळे सोने सापडले सुरक्षित

**खालापूर : प्रतिनिधी**

भंगारात विकलेल्या कपाटात राहीलेले पाच तोळ्याचे सोन्याचे दागीने परत मिळाल्याने कुटुंबीयांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले.

खालची खोपोली, अंबिका ज्वेलर्ससमोर राहणाऱ्या प्रतीक्षा प्रकाश सावंत यांनी त्यांचे जुने कपाट कृष्णानगर येथील मुनीलाल भंगारवाला यांच्या दुकानातील एका फेरीवाल्याला भंगार म्हणून विकले होते, मात्र कपाट विकतांना त्यामधील गुप्त तिजोरीत ठेवलेले पाच तोळ्यांचे सोन्याचे गंठण व चांदीचे दागिने त्यांच्या लक्षात राहिले नव्हते. मंगळवारी सकाळी सावंत यांना दागिन्यांची आठवण झाल्यावर घरात शोध घेतला. कपाटातच दागिने राहिले असल्याची खात्री झाल्यावर क्षणाचाही विलंब न करता भंगार दुकान गाठले. दुकानात पोहचताच विकलेले कपाट तिथेच असल्याचे दिसून आले. सर्वांच्या उपस्थितीत कपाट उघडले असता, आत ठेवलेले सर्व दागिने पूर्णपणे सुरक्षित असल्याचे दिसून आले मौल्यवान ऐवज सुखरूप मिळाल्याने सावंत कुटुंबीयांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. दागिने परत दिल्याबद्दल सावंत यांनी मुनीलाल व संबंधित फेरीवाल्या कर्मचाऱ्याचे आभार मानले.

# दहावी, बारावी परीक्षा केंद्रांभोवती ५० मीटर परिसरात निर्बंध

## झेरॉक्स दुकाने राहणार बंद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

फेब्रुवारी–मार्च २०२६ या कालावधीत होणाऱ्या इयत्ता १२ वी व १० वीच्या सार्वजनिक परीक्षांचा गैरप्रकारमुक्त व शांततेत कारभार पार पडावा यासाठी रायगड जिल्ह्यात परीक्षा केंद्रांवर जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये हा मनाई आदेश जारी केला आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा दि. १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत, तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा दि. २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहेत. या परीक्षांच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व परीक्षा वितरण केंद्रे व परीक्षा केंद्रांवर संबंधित निर्बंध लागू राहणार आहेत.

या मनाई आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या ५० मीटर परिसरात मोबाईल फोन, पेजर वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच एस.टी.डी. बुथ, झेरॉक्स मशिन, फॅक्स मशिन चालू ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रत्येक पेपरच्या २४ तास आधीपासून झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# जनगणनेविषयी पहिले प्रशिक्षण सत्र नवी मुंबईत उत्साहात

**नवी मुंबई ; बातमीदार**

जनगणना कार्य निर्देशालय महाराष्ट्र यांच्या वतीने जनगणना २०२७ विषयक कार्यवाही सुरु होणार असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेचे चार्ज अधिकारी व जनगणनेशी संबधीत अधिकारी यांचा पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण कार्यक्रम महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झाला. याप्रसंगी सहा.संचालक जनगणना अनुमोल एम. आणि सांख्यिकी अधिकारी रुचिता तेलंग यांनी जनगणना कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली.

जनगणना हे राष्ट्रीय काम असून १८७२ मध्ये पहिली जनगणना झाली होती. यापूर्वी झालेल्या २०११ च्या जनगणनेनंतर २०२१ मध्ये जनगणना



होणे अपेक्षित होते. तथापि कोव्हिड कालावधीमुळे त्यावेळी जनगणना होऊ शकली नाही ती आता सुरु होत असून ही देशातील १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना आहे.

सन २०२७ च्या या जनगणनेचे वैशिष्ट म्हणजे ही पहिली डीजिटल जनगणना असून यामध्ये मोबाईल ॲपव्दारे माहितीची नोंदणी होणार आहे तसेच पत्याचे जिओ टॅगिंग केले जाणार आहे. याकरिता एचएलओ हे विशेष ॲप वापरले जाणार आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घर यादी गटानुसार माहिती संकलीत केली जाणार असून दुस–या टप्प्यात नागरिकांची इतर माहिती संकलित केली जाणार आहे. विशेष म्हणजे नागरिक हे ॲपव्दारे स्वत:च्या माहितीची नोंदणी अर्थात स्वगणना करु शकतात. या प्रशिक्षणामध्ये जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात करावयाच्या कामाची सविस्तर माहिती सहा.संचालक जनगणना श्रीम. अनुमोल एम. व सांख्यिकी अधिकारी श्रीम. रुचिता तेलंग यांनी सादरीकरणाव्दारे दिली.

जनगणनेचे काम साधारणत: २५०० हून अधिक प्रगणक करणार असून त्यावर ४०० हून अधिक पर्यवेक्षकांचे निरीक्षण असणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे हे प्रमुख जनगणना अधिकारी असून उपआयुक्त संजय शिंदे हे शहर जनगणना अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. प्रत्येक विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी हे त्या विभागाचे चार्ज ऑफिसर म्हणून काम करणार आहेत. जनगणना २०२७ च्या अनुषंगाने हाऊस लिस्टींग कामकाजास पहिल्या टप्प्यात सुरुवात होणार असून त्याचे पहिले प्रशिक्षण संबधित अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आले.

जनगणना कायदा १९४८ नुसार नागरिकांमार्फत प्रगणकांना दिली जाणारी माहिती ही पूर्णपणे गोपनीय राखली जाते व हा दस्ताऐवज केवळ केंद्रीय जनगणना विभागाच्या अखत्यारित असतो.

# मतदान शांततेत पार पडण्यासाठी रायगडात मनाई आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक–२०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून रायगड जिल्ह्यात दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान व दि. ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया मुक्त, निष्पक्ष व शांततेत पार पडावी, यासाठी जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये संपूर्ण जिल्ह्यात (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) मनाई आदेश जारी केला आहे.

हा मनाई आदेश दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान सुरु होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदरच्या कालावधीमध्ये खालील कृत्य करण्यास मनाई करण्यात आली आहे.या कालावधीत पाच पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास किंवा फिरण्यास मनाई आहे. निवडणूक प्रचार करणे, सार्वजनिक सभा, बैठका घेणे इत्यादी कृतीस मनाई आहे.

राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने बल्क मेसेज करण्यास मनाई आहे. ज्या जिल्हा परिषद व पंचायत समिती हद्दीमध्ये मतदान होणार आहे, तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते /नेते यांना त्या जिल्हा परिषद व पंचायत समिती हद्दीमध्ये थांबणेस मनाई आहे. लाऊडस्पीकर वापरास मनाई आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस मोबाईल फोन, वायरलेस किंवा इतर संपर्क साधने घेवून जाण्यास तसेच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई आहे.

मतदारांना देण्यात येणारी चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी, त्यावर कोणत्याही उमेदवाराचे नाव, पक्षाचे चिन्ह, पक्षाचे नाव नसावे. मतदान केंद्राच्या परिसरात पक्षाचे कार्यकर्त्यांचे निवासस्थाने असल्यास त्याठिकाणी प्रचार करणे, बैठका घेणे, मतदानाकरिता जाणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाहण्यासाठी कोणतेही कृत्य करण्यास मनाई आहे.. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस वाहन आणण्यास मनाई आहे. (अपवाद अपंग /वृध्द / आजारी मतदारांना घेवून येणारी वाहने). मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसराचे आत राजकीय पक्षांचे / उमेदवारांचे निवडणूक बुथ लावण्यास मनाई आहे.

हा मनाई आदेश हा रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदार संघाच्या हद्दीत दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२.०० वा. पासून ते दि. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वा. पर्यंत अंमलात राहील.या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

# उडवणे परिसरात नदीकिनारी एक्सपायरी औषधांचा ढिगारा

## प्रशासनाने दखल घेण्याची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील उडवणे परिसरात अनेक गावांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यालगत नदीच्या कडेला मोठ्या प्रमाणावर एक्सपायर झालेली औषधे, सिरपच्या बाटल्या, गोळ्यांचे मोठमोठे पाकिटे तसेच औषधांचे बॉक्स उघड्यावर फेकून दिल्याचा अत्यंत गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. काही औषधांची विल्हेवाट लावण्याच्या नावाखाली जागेवरच जाळपोळ करण्यात आली असून अर्धवट जळालेला औषध कचरा आजूबाजूला विखुरलेला आहे. प्रत्यक्ष पाहणीदरम्यान अनेक औषधांच्या पॅकिंगवर बालरुग्णांसाठी वापरली जाणारी औषधे असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. म्हणजेच ही औषधे प्रामुख्याने लहान मुलांसाठीची असून त्यामुळे धोका अधिकच गंभीर ठरतो आहे.

हा रस्ता मुख्य असल्याने रोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, कामगार व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये–जा सुरू असते. रस्त्यालगत मोठी वस्ती असून नदीच्या पलीकडे उडवणे गाव व इतर परिसर जोडलेले आहेत. औषधांच्या ढिगाऱ्याजवळच लहान मुलांची शाळा असल्याने कोणताही अपघात कधीही घडू शकतो.



औषधांमधील रासायनिक घटक नदीत मिसळून पाणी प्रदूषित होत असून जाळलेल्या औषधांचा धूर आरोग्यास घातक असल्याचे नागरिक सांगत आहेत. नियमांनुसार एक्सपायर औषधांची सुरक्षित विल्हेवाट लावणे बंधनकारक असताना उघड्यावर टाकणे व जाळणे हा कायद्याचा गंभीर भंग आहे.

या प्रकरणात अन्न व औषध प्रशासन , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच स्थानिक प्रशासन यांनी तात्काळ दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

पान १ वरुन

# केंद्रीय अर्थसंकल्प वेगवान विकासाला नवी दिशा देणारा –आमदार निरंजन डावखरे

या ऐतिहासिक अर्थसंकल्पासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मनापासून अभिनंदन करतो तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आत्मनिर्भर, समृद्ध आणि जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करेल, असा आमदार डावखरे यांनी व्यक्त केला.

केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे एक लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे सांगण्यात आले. शहरीकरणाला नियोजनबद्ध करून उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, जी पूर्वी केवळ एक लाख कोटी असायची. पाच लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे तसेच शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत.


देशभरातील प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृहांची निर्मिती होणार आहे. यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींची राहण्याची मोठी सोय होणार असल्याचे आमदार डावखरे यांनी नमूद केले. त्याचबरोबर चामड्याध्या वस्तू, सिंथेटिक पादत्राणे, चामड्याची उत्पादने, १७ कर्करोग आणि मधुमेहावरील औषधे शुल्कमुक्त, लिथियम आयन बॅटरी, मोबाईल बैटरी, सौर ग्लास, मिश्र वायू सीएनजी, ईव्ही, मायक्रोवेव्ह ओव्हन, विमान इंधन, परदेश प्रवास स्वस्त होणार असल्याची माहितीही या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी दिली.

# सिडकोची कळंबोलीत अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत २ फेब्रुवारी रोजी कळंबोली नोड येथे निष्कासन मोहिम राबवून सिडको अधिसूचित जागेवरील सेक्टर २३, भुखंड क्र. ३८ येथील मार्बल व्यावसायिक दुकाने, ट्रक पार्किंग तसेच सेक्टर २०, भुखंड क्र. ५ व ६ येथील ट्रक पार्किंग आणि सेक्टर १६ए, भुखंड क्र. ५ व ६ येथील ऊऊ चा ढाबा व सर्विसिंग सेंटर, टपरी, इत्यादी. अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आले.

सदरची कारवाई सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन व सिडको



महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली असल्यामुळे अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली.

सदरची मोहीम सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली

## निवडक

### भाताण येथून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** १९ वर्षीय तरुणी राहते घरातुन कोणास काहीएक न सांगता कोठेतरी निघुन गेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. दिप्ती हेमंत मोरे (वय १९) असे या तरुणीचे नाव असून ती भाताण येथे राहणारी आहे. ती अंगाने सडपाताळ, रंग निमगोरा, उंची ५.१, चेहरा-उभट, डोकिचे केस लांब, डोळे काळे, अंगामध्ये अंगामध्ये नेसुस पिवळ्या रंगाचा सलवार कुर्ता, पायामध्ये राखाडी रंगाचे सँडेल आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.शी जी एस जादव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राजेंद्र पाटील यांचा सत्कार

**पनवेल :** पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र पाटील यांचा शिवसेना पक्षातर्फे सत्कार करण्यात आला. या वेळी शिवसेना पक्षाचे पनवेल महानगर प्रमुख ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, सचिन मोरे, शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, मंदार काणे, अभिजित साखरे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# भाजप महायुतीच्या उमेदवारांचा घरोघरी प्रचार

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्व भूमीवर, भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांनी आपला प्रचार वेगाने सुरू आहे. चाणजे जिल्हा परिषद २८ गटाचे अधिकृत उमेदवार रीना जितेंद्र घरत, केगाव पंचायत समिती ५५ गणाचे अधिकृत उमेदवार राजेंद्र आत्माराम ठाकूर व ५६ चाणजे पंचायत समिती गणचे उमेदवार कैलास मोरेश्वर भोईर यांचा प्रचार वेगात सुरू आहे.





चाणजे ग्रामपंचायतचे माजी सरपंच तथा चाणजे विभाग भाजप अध्यक्ष जितेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचार रॅली काढण्यात आली होती. उरण येथील केगाव, म्हातवली, नागाव, चाणजे, करंजा, येथील सात पाडे येथे प्रचार जोरात सुरू आहे.

या वेळी चाणजे ग्रामपंचायतचे माजी सरपंच तथा चाणजे विभाग भाजप अध्यक्ष जितेंद्र घरत, स्वप्नील माळी, बाळसाहेब भोजने, संतोष लवेकर, रोहन पाटील, वीरेंद्र घरत, राजेश गावडे, समीर कुथे, सुरज ठवले, दिपेश कोळी, हरेश कातकरी, मिलिंद सोनावणे, दीपिका पाटील. अमृता घरत, जितेंद्र नाईक, विनया ठाकूर, निलेश थळी, गणेश पाटील, रवींद्र घरत, वनिता कडू, नीता घरत, मयुरी पाटील, रजनी घरत, नीता घरत, मीना म्हात्रे, सागर म्हात्रे, प्रीतम म्हात्रे, कैलास कोळी, अमोल म्हात्रे, दीपक म्हात्रे, राजेश म्हात्रे, सुहास पाटील, नंदकुमार पाटील, रवी घरत, सनी म्हात्रे, राजेश नाखवा, मंदार म्हात्रे, तुषार मढवी, वीरेंद्र घरत, तृप्ती घरत, वैशाली घरत, लता पाटील, योगिता म्हात्रे, सन्तु सिंग, सुनील म्हात्रे, विनोद नाखवा, सिद्धार्थ कोळी, मंगेश म्हात्रे आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## लोधीवली, नढाळ परिसरामध्ये भाजप महायुतीचा जोरदार प्रचार

**रसायनी : प्रतिनिधी**

भाजपचे उमेदवार नेहा भूषण पारंगे व कृष्णा पारंगे यांनी वासाबे जिल्हा परिषद व रिस पंचायत समिती यामध्ये लोधीवली व नढाळ या भागात घराघरात जाऊन प्रचार केला आहे. यांच्याबरोबर संख्येने भाजपचे कार्यकर्ते पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य होते आणि यांना वाढता पाठीबा जनतेवर मिळत आहेत.

त्यामुळे उमेदवारांना विजयाची खात्री आहे. यांच्याबरोबरच गण क्रमांक ३२ मधून रिस पंचायत समितीचे कृष्णा गंगाराम पारंगे हे उभे आहेत. ते मोहोपाडामध्ये सरपंच होते, उपसरपंच होते आणि सदस्य होते आणि या भागात विकासाची खूप कामे केले आहेत. त्यामुळे रिस मधून कृष्णा पारंगे हे सहज विजयी होतील, असे चित्र आहे. भाजपचे सर्वच अधिकारी यांच्यावर काम करत आहेत आणि या वासांबे विभागामध्ये भाजप बाजी मारेल असे कार्यकर्त्यांनी या वेळी सांगितले.





**रसायनी : भटवाडी, रिस, कांबा तसेच तळेगाव, पानशीळ व पराडे आदिवासी भागात मंगळवारी भाजप महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार प्रचार केला. महायुतीचा उमेदवार नेहा भूषण पारंगे व अर्चना आत्माराम भोईर यांनी वासांबे जिल्हा परिषद व वासांबे पंचायत समिती गणात मोहपाडा मार्केट व आळी आंबिवली, खाने आंबिवली येथे घराघरात जाऊन प्रचार केला.**

## डिझेल चोरणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील बई पुणे एक्सप्रेस हायवेवरील ॲमेटी युनर्व्हसीटी येथील ट्रक पार्कीगमध्ये उभ्या असलेल्या ट्रक मधील डिझेल चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल तालुका पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेल्या गाडीसह चोरीचे डिझेल असा मिळून जवळपास एक लाख ६२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.

फिर्यादी मोहम्मद साहिल लियाकत अली (वय २८) हे त्यांचे ताब्यातील कंटेनर ट्रक क्र. एचआर-६१/ई-६७४२ हा मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील ॲमेटी युनर्व्हसीटी येथील ट्रक पार्कीगमध्ये पार्क करुन विश्रांती घेत असताना तीन अनोळखी व्यक्तींनी फिर्यादी यांचे ट्रकमधील १५० लिटर डिझेल चोरी करुन पळून गेले. त्यामुळे अज्ञात चोरट्या इसमांविरूध्द पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आला.

त्याअनुषंगाने वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गिजे, पोलीस उपनिरीक्षक राजपूत, पोहवा देवरे, कुदळे, तांडेल, धुमाळ, म्हारसे, बाबर, पोशी आकाश भगत आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासद्वारे आरोपी प्रमोदकुमार दुर्गा सिंग (वय ३१) व अजय उर्फ उम्या गजानन खंदारे (वय १८ वर्ष) या दोघांना नवी मुंबई येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली सफेद रंगाची स्वीफ्ट डिझायर व १४० लिटर डिझेल असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## कमला देशेकर, अंकुश खैर यांना भरघोस मतांनी विजयी करा -शिवाजी दुर्गे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप विकासाचा ध्यास घेऊन काम करत असून, या माध्यमातून अनेक मूलभूत समस्या मार्गी लागल्या आहेत. आपल्या परिसरात विकासाची कामे वेगाने सुरू असून भविष्यातही ही विकासाची गंगा अशीच अविरतपणे सुरु राहणार असून जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार कमला देशेकर आणि पंचायत समिती गणाचे उमेदवार अंकुश खैर यांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन भाजपचे ज्येष्ठ नेते शिवाजी दुर्गे यांनी सोमवारी प्रचार दरम्यान केले.





भाजप महायुतीच्या वावंजे जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार कमला देशेकर आणि चिंध्रण पंचायत समिती गणाचे उमेदवार अंकुश खैर यांच्या प्रचारार्थ सध्या मतदारसंघात झंझावात सुरू आहे. या प्रचार मोहिमेअंतर्गत सोमवारी खेरवाडी आणि करंबेली या वाड्यांमध्ये मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी उमेदवारांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

या प्रचार दौऱ्यात पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रतक्प्रभा घरत, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, भाजप नेते शिवाजी दुर्गे, नरेश पाटील आणि अशोक शेळके यांच्यासह ज्येष्ठ नेत्यांनी सहभाग घेऊन मतदारांना महायुतीच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले.

या वेळी चिंध्रणचे सरपंच एकनाथ पाटील, खैरवाडीचे उपसरपंच हनुमान, खानावचे उपसरपंच हरिश्चंद्र गोंधळी, माजी सरपंच तुकाराम पाटील, भाजप प्रवक्ते महादेव गडगे, गणपत कडू, अनंता कडू, बाबू मुंबईकर, रामचंद्र पालेकर, रवी पाटील, बाबू चौधरी, चांगु चौधरी, दत्ता भगत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावोगावी होणाऱ्या या प्रचारामुळे महायुतीच्या उमेदवारांचे पारडे जड होत असून कार्यकर्त्यांमध्येही उत्साह आहे.

## 'सीकेटी'त निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त)च्या इंग्रजी विभागातर्फे संस्थेचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५व्या अमृतमहोत्सवीवर्षानिमित्त दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन उत्साहात करण्यात आले.

या स्पर्धांचा प्रारंभ ३० जानेवारी २०२६ रोजी निबंध लेखन स्पर्धेने झाला, तर ३१ जानेवारी २०२६ रोजी वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या दोन्ही स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेला चालना देणे, अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे व सृजनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये महात्मा फुले आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामशेठ ठाकूर कॉलेज, खारघर, भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ तसेच के. बी. पी. कॉलेज, वाशी या विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. निबंध लेखन स्पर्धेत एकूण १७० विद्यार्थ्यांनी, तर वक्तृत्व स्पर्धेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्पर्धांचे निष्पक्ष व गुणवत्तापूर्ण मूल्यमापन करण्यासाठी बाह्य परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये प्रा. विशाल बोडले (सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग, एस.आय. ई. एस कॉलेज, नेरूळ), डॉ. रमेश यादव, प्रा. दुर्गादेवी मौर्या (रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर) , डॉ. राम भीसे (एस.आय.ई.एस. ग्रॅज्युएट स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (स्वायत्त)) व डॉ. दीप्ती मंडलिक (ॲमिटी स्कूल ऑफ लँग्वेजेस, ॲमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.



स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसे, आकर्षक चषक (ट्रॉफी) व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांकास ५,००० रुपये, द्वितीय क्रमांकास ४,००० रुपये व तृतीय क्रमांकास ३,००० रुपये अशी रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी मुख्य अतिथी म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य ॲड. राहुल घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक सादर करताना इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले यांनी स्पर्धेची ध्येय-धोरणे आणि उद्दिष्ट्ये विषद केली.

पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख मुख्य अतिथी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य ॲड. राहुल घरत आपल्या भाषणात त्यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो तसेच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांनी अभिव्यक्तीचे महत्व समजावून सांगताना त्याचे व्यक्तिमत्वविकासात अनन्यसाधारण महत्व असल्याचे उधृत केले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागातील प्रा. के. एन.पाटील, तर आभार प्रदर्शन प्रा. आर. के. पाटील यांनी केले.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांना विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले, इंग्रजी विभागातील प्राध्यापक डॉ. एस. एन.परकाळे, प्रा. आर. के. पाटील, प्रा. के. एन.पाटील, प्रा. अम्मू उन्निकृष्णन, प्रा. एम. पी. पाटील यांनी परिश्रम घेतले.

**निबंध लेखन स्पर्धेचे विजेते**

प्रथम प्रीती अरुण थोरात (प्रथम वर्ष विज्ञान शाखा), द्वितीय स्नेहा अस्त चौधरी (तृतीय वर्ष विज्ञान शाखा), तृतीय नुरुन्निहार मोहम्मद नजीम उद्दीन (प्रथम वर्ष कला शाखा)

**वक्तृत्व स्पर्धेचे विजेते**

प्रथम प्रिया शेषनाथ चौधरी (पदव्युत्तर पदवीधर विज्ञान शाखा- भाग २), द्वितीय जान्हवी भास्कर हातमोडे (पदव्युत्तर पदवीधर कला शाखा- भाग १), तृतीय साशा वायगंणकर (तृतीय वर्ष विज्ञान शाखा)

## कळंबोलीच्या लिमये महाविद्यालयाची होप फाऊंडेशनला औद्योगिक भेट

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

सुधागड एज्युकेशन सोसायटी संचालित शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र (Computer Science) विभागाच्या वतीने पुण्यातील हिंजवडी येथील होप फाऊंडेशनच्या आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेस (International Institute of Information Technology - Hinjawadi) एक दिवसीय औद्योगिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या भेटीत विद्यार्थ्यांनी आयटी क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेतला.



या औद्योगिक सहलीत विभागातील २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या भेटीदरम्यान, होप फाऊंडेशनचे डॉ. व्ही. राजेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी, पायाभूत सुविधा आणि प्रत्यक्ष कामकाजाची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी आयटी कंपन्यांना भेटी देऊन सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा मॅनेजमेंट आणि कॉर्पोरेट कार्यसंस्कृतीची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या संधी आणि आवश्यक तांत्रिक कौशल्यांबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. पी. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व आयक्यूएसी (IQAC) समन्वयक प्रा. डॉ. जाधव बी. बी., संगणक शास्त्र विभागाच्या प्रमुख श्रीमती आरती सावंत, तसेच प्राध्यापक पूजा चंदे, गिरीश कुंभार, अनिता म्हात्रे आणि जोशिला मॅडम यांच्या नियोजनाखाली ही सहल यशस्वीरित्या पार पडली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानाला प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांची जोड मिळाली, ज्यामुळे त्यांचे औद्योगिक क्षेत्राविषयीचे ज्ञान अधिक समृद्ध झाले.

## सराईत चोर अटकेत

**पनवेल :** परिसरातून मोटरसायलची चोरी करणारा एका सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

संकेत राणे यांनी त्यांचे मालकीची ७० हजार रुपये किमतीची बजाज मोटरसायकल ही यश कमल हौसिंग सोसायटी येथे उभी करून ठेवली असता प्रफुल पळसपगार (वय २५ रा. कळंबोली) याने गाडीचे लॉक तोडून चोरून नेली होती.

पोलिसांच्या पथकाने गुन्हेगार हा चोरीच्या मोटरसायकलसह सापडल्याने त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चोरीची मोटार सायकल, लोकखंडी कानसा तुकडा व मोबाईल फोन हस्तगत केला आहे. मोबाईल फोनसुद्धा त्याने कळंबोली येथून चोरल्याचे निष्पन्न झाले आहे.

## रसायनी-मोहोपाडा परिसरातील नागरिकांसाठी मोठी आरोग्य सुविधा

**रसायनी : प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या अनोख्या उपक्रमामुळे गंभीर आजारांवरील उपचारांसाठी नागरिकांना आता मुंबईकडे धाव घ्यावी लागणार नाही. आता रसायनी-मोहोपाडा परिसरातही सुपर-स्पेशालिटी डॉक्टरांची सेवा उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमाअंतर्गत हृदयविकार, पोटाचे विकार, मूत्रविकार, मूत्रपिंड विकार आणि ऑर्थोपेडिक तज्ज्ञ डॉक्टरांची ओपीडी सेवा सुरू करण्यात आली आहे. इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. अनुप महाजनी, गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजिस्ट डॉ. दीपक अहिरे, युरोलॉजिस्ट डॉ. विकास भिसे, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. अमित नागरिक आणि ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. प्रमोद भोर ठराविक दिवशी रुग्णसेवा देणार आहेत. ही सेवा पल्स हॉस्पिटल, निरामय हॉस्पिटल, श्रेयांश आणि डॉ. पाटील हॉस्पिटल येथे दुपारी ३ ते ४.३० या वेळेत उपलब्ध असेल. अपॉइंटमेंटसाठी ८६५५४ ७८५३५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# अभूतपूर्व करार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरून संभाषण झाल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी भारत-अमेरिकेदरम्यानच्या व्यापार कराराची घोषणा केली. वर्षभर खोळंबलेला हा व्यापार करार दोन्ही देशांसाठी महत्त्वाचा असून जागतिक माध्यमांनी त्याचे वर्णन 'अभूतपूर्व' असे केले आहे. अलीकडेच युरोपियन युनियनशी भारताचा मुक्त व्यापार करार झाला. पाठोपाठ ट्रम्प यांनीही भारतासोबत व्यापार कराराची घोषणा केल्याने भारतीय निर्यातदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बहुप्रतिक्षित भारत-अमेरिका व्यापार करारावर सहमती झाल्याचे सोमवारी जाहीर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही लगेचच समाजमाध्यमांवर ट्रम्प यांचे आभार मानणारा आणि व्यापार कराराचे स्वागत करणारा संदेश पोस्ट केला. गेल्यावर्षी अमेरिकेकडून भारतीय वस्तूमालावर २५ टक्के इतके मूळ आयातशुल्क (टॅरिफ) लागू झाले. त्यानंतर ट्रम्प यांनी अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ दंड म्हणून लागू केला. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात खनिज तेल आयात करत असल्याबद्दल दंड म्हणून अतिरिक्त टॅरिफचा बडगा उगारण्यात आला. आता भारताने रशियाकडून तेलखरेदी थांबवल्यामुळे ५० टक्के टॅरिफमध्ये कपात करून ते १८ टक्क्यांवर आणण्यात आले आहे. ट्रम्प यांनी याला ऐतिहासिक करार म्हटले असून यामुळे भारत-अमेरिका व्यापारी संबंधांमध्ये मोठा बदल घडण्याची शक्यता आहे. गेला काही काळ ट्रम्प यांच्या एकतर्फी घोषणांमुळे भारत-अमेरिका संबंधात काहिसा दुरावा निर्माण झालेला दिसत होता. परंतु पंतप्रधान मोदी यांनी ट्रम्प यांच्यासोबतच्या त्यांच्या मैत्रीपूर्ण आणि जवळच्या संबंधांचा फायदा घेत अमेरिकेसोबतचा व्यापार करार अंतिम केला आहे. आपल्या सर्व शेजारी राष्ट्रांपेक्षा आणि आपल्याशी स्पर्धा करणाऱ्या सर्व देशांपेक्षा भारताला मिळालेला करार सर्वोत्तम आहे. त्यामुळे आपण सर्वांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो असे केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटले असून कराराबद्दल नकारात्मक बोलणारे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी देशाची माफी मागावी अशी संतप्त प्रतिक्रियाही गोयल यांनी व्यक्त केली. ट्रम्प यांनी करारासंदर्भात समाजमाध्यमांवर घोषणा केल्यानंतर भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत मजबूत झाल्याचे दिसले. भारत-अमेरिका व्यापार करारामुळे भारताची निर्यात वाढेल, आपल्या अभियांत्रिकी क्षेत्रातील सुटे भाग बनवणारे, वस्त्रोद्योग, सागरी उत्पादने, दागिने क्षेत्र यांसह सर्व उत्पादन क्षेत्रांना अनेक संधी मिळतील असे पीयूष गोयल यांनी म्हटले आहे. या करारामध्ये भारतीय शेतकऱ्यांच्या हिताशी कुठलीही तडजोड करण्यात आलेली नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे बंद केल्यामुळे करार मार्गी लागला असे ट्रम्प सुचवत आहेत. मात्र ज्या देशांवर निर्बंध नाहीत अशा देशांकडून दरांच्या आधारावर तेलाची खरेदी भारत सुरू ठेवेल असे भारत सरकारची सूत्रे सांगत आहेत. दोन्ही देशांमध्ये कृषी क्षेत्रासंदर्भात दीर्घकाळ वाटाघाटी सुरू होत्या. या वाटाघाटींदरम्यान भारताने राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेले कृषी क्षेत्र अमेरिकेसाठी खुले करण्यास नकार दिला होता. कृषी आणि दुग्धव्यवसायाशी संबंधित क्षेत्र जे आतापर्यंत सुरक्षित होते, त्यांना यापुढेही संरक्षण कायम असणार आहे. ५०० अब्ज अमेरिकन डॉलरहून अधिक किंमतीच्या अमेरिकन वस्तूंची खरेदी करण्याचे भारताने मान्य केले आहे असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे. या ५०० अब्ज डॉलर्सच्या आकड्यांमध्ये विमानखरेदी करार आणि इतर गुंतवणुकीचा समावेश आहे असेही भारत सरकारमधील सूत्रांनी स्पष्ट केले आहे.**

# स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी



महाराष्ट्रातील एक ख्यातकीर्त गायक व संगीतरचनाकार. ज्यांना २००९ मध्ये 'भारतरत्न' सन्मान मिळाला. शक्तिशाली आवाजासाठी प्रसिद्ध असलेल्या जोशींनी शास्त्रीय संगीतासह, मराठी अभंग आणि नाट्यसंगीतातही अमूल्य योगदान दिले. 'माझे माहेर पंढरी', 'इंद्रायणी काठी' आणि 'तीर्थ विठ्ठल' ही त्यांची अजरामर मराठी गाणी आहेत

त्यांचे पूर्ण नाव भीमसेन गुरुराज जोशी. त्यांचा जन्म गुरुराज व रमाबाई या दांपत्यापोटी धारवाड जिल्ह्यातील रोण या त्यांच्या मावशीच्या गावी झाला. त्यांचे मूळ गाव गदगजवळचे होंबळ असून आजोबा भीमाचार्य हे गदगमध्ये स्थायिक झाले होते. ते कीर्तनकार-गायक होते. भीमसेन यांची आईही सुमधुर भजने म्हणत असे, तर वडील गुरुराज हे शिक्षक असून वेदान्तपारंगत होते. त्यांचे घराणे वंशपरंपरागत ज्योतिषी होते.

बालपणापासून भीमसेन यांना गायनाचे विलक्षण आकर्षण होते. ते आईसोबत कानडी भजने म्हणत. तीव्र नैसर्गिक बुद्धिमता असूनही अभ्यासात त्यांचे मन रमले नाही. शाळेत जाता-येताना वाटेवरील ध्वनिमुद्रिकेच्या दुकानात उ. अब्दुल करीमखाँ यांची झिंझोटी रागातली ठुमरीची ध्वनिमुद्रिका व १९३२ साली पं. सवाई गंधर्व (रामचंद्र गणेश कुंदगोळकर) ह्यांची गदगमधील मैफल यांतील किराणा घराण्याच्या दोन गायकांची गायकी ऐकून त्यांनी शास्त्रीय संगीत शिकण्याचा ध्यासच घेतला. ह्या बालवयात किरकोळ कारणासाठी रागावून त्यांनी घर सोडले, पण काही कालावधीने ते घरी परतले. त्यांची गाण्याची आत्यंतिक आवड पाहून वडलांनी उ. इनायतखाँ यांचे गदगमधील शिष्य अगसरू चन्नाप्पा कुर्तकोटी ह्यांच्याकडे भीमसेन यांना गाण्याची शिकवणी सुरू केली. त्यांच्याकडून वर्षभरात २०-२१ रागांशी त्यांचा प्राथमिक परिचय झाला; पण सखोल ज्ञानाची आस लागून राहिली. गुरूच्या शोधात ते घराबाहेर पडले आणि उपाशी-अर्धपोटी, रेल्वेने विनातिकीट प्रवास करत ग्वाल्हेरला हाफीज अलीखाँ यांच्याकडे (सरोदवादक अमजद अलीखाँ यांचे वडील) पोहोचले. त्यांच्याकडच्या वास्तव्यात मारवा रागाची तालीम आणि कृष्णराव पंडित, कुंडलगुरू बाळाभाऊ उमडेकर व राजाभैय्या पूँछवाले ह्यांच्याकडच्या श्रवणभक्तीतून गायनाचे मूलभूत संस्कार त्यांना लाभले. राजाभैय्यांच्या सूचनेवरून ते खडकपूरला केशव लुखे यांच्याकडे गेले; पण ते वास्तव्य निष्फळ ठरले. पुढे कोलकात्याला (पूर्वीचे कलकत्ता) पहाडी संन्याल ह्या बॉम्बे टॉकीजच्या अभिनेत्याने त्यांना गांधारी हा अनवट राग शिकवला. तेथून त्यांनी दिल्ली व मग जलंदरकडे प्रयाण केले. तेथील आर्य संगीत विद्यालयाचे अंधचालक धृपदिये मंगतराम ह्यांच्याकडे धृपद संगीताची तालीम मिळाली व सोबतच भरपूर व्यायाम, सकस आहार ह्यांमुळे त्यांची तब्येतही सुधारली. हरिवल्लभ संगीत संमेलनात भेटलेल्या पं. विनायकबुवा पटवर्धनांनी दिलेला सवाई गंधर्वांकडे गाणे शिकण्याचा सल्ला शिरोधार्य मानून भीमसेन घरी परतले. वडलांनी त्यांना कुंदगोळला सवाई गंधर्व (रामभाऊ कुंदगोळकर) यांच्याकडे रुजू केले; पण वयाच्या चौदाव्या वर्षी आवाज फुटल्याने आवाजावर मेहनत करत थोडी तालीम आणि जास्त श्रवणभक्ती करावी लागली. पण गुरुभगिनी गंगूबाई हनगल (हनगळ), गुरुबंधू नाडगीर, पं. मल्लिकार्जुन मन्सूर, सुरेशबाबू माने ह्यांचे गायन ऐकायला मिळाले. सवाई गंधर्वांकडे त्यांनी निरलसपणे गुरुसेवा करून व अतिशय कष्टाने गानविद्या संपादन केली. गंधर्वांनी पुढच्या शिक्षणाला अचानक नकार दिल्यामुळे भीमसेन रामपूर संस्थानात मुश्ताक हुसेनखाँ साहेबांकडे गेले. तिथे वर्षभर नटमल्हार घोटला. पुढे सवाई गंधर्वांनी भीमसेन यांना पुन्हा बोलावले. त्यांच्याकडे तोडी, मुलतानी व पूरिया ह्या फक्त तीन रागांचा सराव तीन वर्षे चालला. पण आसावरी, पूरिया धनश्री, तोडी, पूरिया, भैरवी, नटमल्हार ह्या रागांचा गंधर्वांनी केलेला रियाज ऐकून गायनातील काळाचे अचूक भान व घराण्याच्या शिस्तीचे धडे मिळाले. मंद्र व तारसप्तकात आवाज सहजपणे फिरावा म्हणून भीमसेनांनी दिवसाकाठी चौदा-चौदा तास मेहनत केली. त्यामुळे प्रसन्न होऊन गंधर्वांनी त्यांना उदारहस्ते गानविद्या दिली. त्यांच्या मैफली ऐकून मैफलीच्या गाण्याचे नियोजन कसे करावे, श्रोत्यांनुसार कोणत्या रागांची व गानप्रकारांची निवड करावी, ह्या गोष्टी भीमसेनांनी आत्मसात केल्या. सवाई गंधर्वांच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या पुण्याच्या समारंभात ते प्रथमच चमकले (१९४६).

भीमसेन लखनौ आकाशवाणी केंद्राचे मान्यताप्राप्त कलाकार झाल्यामुळे चरितार्थाचा प्रश्न सुटला. इथेच त्यांना थिरकवा साहेबांचा तबला, निस्सार हुसेनखाँचे वडील फिदाहुसेनखाँ ह्यांचे गाणे मनसोक्त ऐकावयास मिळाले. बेगम अख्तर, व्ही. जी. जोग, गिंडे, भट, रातंजनकर, रसूलनबाई ह्यांच्याशी त्यांचा परिचय झाला. बिस्मिल्लाखाँशी तर स्नेहच जडला होता. मुंबई व निजाम ह्या रेडिओ केंद्रांशी ते जोडले गेले. त्यांना गायनाची निमंत्रणे आल्यामुळे मैफलीचे तंत्र अवगत झाले आणि जीवनाला सुखद कलाटणी मिळाली. कोलकात्याला झालेल्या एंटाली संगीत महोत्सवात त्यांनी सादर केलेल्या गायनास बंगाली रसिकांनी भरभरून दाद दिली (१९५३). भीमसेनांची कीर्ती देशात व विदेशांतही पसरत गेली. त्यांच्या मैफलींना सर्वत्र अमाप लोकप्रियता लाभली आणि आर्थिक सुबत्तेबरोबर अनेक मानसन्मानही लाभले. सवाई गंधर्वांची मूळची स्वरप्रधान, आलापचारीची व माफक आक्रमक अशी गायकी भीमसेनांनी अधिक आक्रमक, अधिक गतिमान आणि पहिल्या सुरापासून पकड घेणारी अशी केली. त्यांच्या गायकीच्या या वैशिष्ट्यांमुळेच संगीतेतिहासात त्यांचे स्थान अजरामर झाले आहे.

धन्य ते गायनीकळा ह्या नाटकाचे त्यांनी संगीत-दिग्दर्शन केले (१९६८). गुळाचा गणपती, बसंतबहार, भैरवी, पतिव्रता, स्वयंवर झाले सीतेचे ह्या चित्रपटांसाठी त्यांनी पार्श्वगायन केले. संतवाणी हा अभंगांचा व रंगवाणी हा नाट्यगीतांचा खास आविष्कार, बालमुरलीकृष्णन् ह्या दाक्षिणात्य संगीततज्ज्ञाबरोबरची जुगलबंदी, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासोबतचे ध्वनिमुद्रण, भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवात (१९९७) संसदेत सादर केलेले वंदे मातरम्, मिले सूर मेरा तुम्हारा ह्या राष्ट्रैक्याच्या बहुभाषिक गीतातील प्रमुख सहभाग ही त्यांची मैफलींशिवायची गानविविधता आहे. 'संतवाणी' आणि 'अभंगवाणी' हे संगीतकार राम फाटक आणि श्रीनिवास खळे ह्यांनी अनुक्रमे स्वरबद्ध आणि पंडितजींनी स्वरसाज चढवलेले अल्बम खूप गाजले. भीमसेन जोशींनी 'संतवाणी' या नांवाने मराठी अभंगगायनाचे अक्षरशः हजारो कार्यक्रम केले. कवि वसंत बापट त्यांच्या अभंगवाणी कार्यक्रमात अनेकदा अतिशय सुरेख निरूपण करीत.

पं. भीमसेन जोशी यांना शासनाकडून पद्मश्री (१९७२), पद्मभूषण (१९८५), पद्मविभूषण (१९९९) ह्या व २००८ मध्ये 'भारतरत्न' ह्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ह्यांव्यतिरिक्त संगीतरत्न (१९७१), संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार (१९७६) इत्यादी सन्मान त्यांना लाभले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गुलबर्गा विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ह्यांनी त्यांना सन्मान्य डी. लिट पदवी प्रदान केली. जेम्स बेवरिज व हिंदी कवी गुलजार ह्यांनी त्यांच्या जीवनावर लघुपट बनविला आहे.

त्यांचा पहिला विवाह सुनंदा कट्टी या त्यांच्या मामेबहिणीशी झाला (१९४३) आणि दुसरा विवाह त्यांनी नागपूरमध्ये पूर्वाश्रमीच्या वत्सला मुधोळकर या गायिकेशी केला (१९५१). सवाई गंधर्वांना देवाज्ञा झाल्यावर (१९५२) नानासाहेब देशपांडे (सवाई गंधर्वांचे जावई) व पं. भीमसेन यांनी पुण्यात 'सवाई गंधर्व पुण्यतिथी संगीत महोत्सव' सुरू केला (१९५३). त्यास उत्तरोत्तर श्रोत्यांचा वाढता प्रतिसाद मिळाला. पुढे 'सवाई गंधर्व संगीत महोत्सव' हा राष्ट्रीय स्तरावरचा कार्यक्रम झाला. या महोत्सवास नामांकित गायक-गायिका हजेरी लावतात. पं. भीमसेन यांच्या गायनाने या महोत्सवाचा शेवट होत असे. अखेरची काही वर्षे प्रकृती-अस्वास्थ्यामुळे ते गाऊ शकत नव्हते; पण या उत्सवात ते उपस्थित राहत. पत्नी वत्सलाबाईंचा मृत्यू व स्वतःच्या झालेल्या नऊ शस्त्रक्रिया ह्यांमुळे ते जरा विकल व एकाकी झाले होते. त्यातच त्यांचे मुक्कामी वृद्धापकाळाने २४ जानेवारी २०११ रोजी, पुणे येथे वयाच्या ८८व्या वर्षी देहावसान झाले

किराणा घराण्याचा भीमसेन जोशी यांचा गानवारसा त्यांचे पुत्र श्रीनिवास जोशी आणि शिष्य माधव गुडी, उत्तमराव पाटील, श्रीकांत देशपांडे व उपेंद्र भट हे पुढे चालवत आहेत.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# जीमेलचा पासवर्ड विसरला... या ट्रिकने मिळेल परत

आजच्या डिजिटल युगात जीमेल हा आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. Google Drive, Google Photos आणि YouTube सारख्या अनेक महत्त्वाच्या ॲप्सवर ई-मेल पाठवण्यापासून ते फक्त जीमेल खात्याद्वारेच ॲक्सेस उपलब्ध आहे, पण तुम्ही तुमचा जीमेल पासवर्ड विसरला असाल तर घाबरण्याची गरज नाही. काही सोप्या स्टेप्स फॉलो करून तुम्ही तुमच्या जीमेल अकाउंटमध्ये काही मिनिटांत पुन्हा प्रवेश करू शकता.



तुम्ही तुमचा जी मेल पासवर्ड विसरला असल्यास, तो रीसेट करण्यासाठीपासवर्ड रिकव्हरी पेजवर जा. सर्व प्रथम आपल्या ब्राउझरमध्ये Google account Recovery Page उघडा. येथे तुम्हाला तुमचा जी मेल ॲड्रेस टाकावा लागेल आणि Next बटणावर क्लिक करावे लागेल.

जुन्या पासवर्डने व्हेरिफाय करा : Google प्रथम तुम्हाला तुमचा पूर्वीचा पासवर्ड विचारेल. आपल्याला आठवत असल्यास, तो टाका आणि Next क्लिक करा. तुम्हाला जुना पासवर्ड आठवत नसेल, तर Try another way हा पर्याय निवडा.

ओटीपी सह खाते व्हेरिफाय करा Google तुमच्या खात्याशी लिंक केलेल्या मोबाइल नंबरवर जढ्झ (वन-टाइम पासवर्ड) पाठवेल. मोबाईल नंबरवर प्राप्त झालेला ओटीपी एंटर करा आणि Next बटण दाबा.

**बॅकअप ई-मेल किंवा सुरक्षा प्रश्न**

तुम्हाला तुमच्या मोबाईल नंबरवर Google तुमच्या बॅकअप ई-मेलवर पडताळणी लिंक पाठवू शकते. काही प्रकरणांमध्ये, तुम्हाला सुरक्षा प्रश्नांची उत्तरे देण्याचा पर्याय देखील मिळू शकतो.

**नवीन पासवर्ड सेट करा**

पडताळणी केल्यानंतर, तुम्हाला नवीन पासवर्ड तयार करण्याचा पर्याय मिळेल. एक नवीन पासवर्ड निवडा जो मजबूत असेल आणि जो तुम्ही सहज लक्षात ठेवू शकता. पुष्टी करा बटणावर क्लिक केल्यानंतर तुमचा पासवर्ड रीसेट केला जाईल. पासवर्ड लक्षात राहण्यासाठी तुमचा पासवर्ड नोटबुकमध्ये लिहून सुरक्षित ठेवा. वेळोवेळी पासवर्ड बदलत राहा.

# जागतिक कर्करोग दिन




## निमित्त

जागतिक कर्करोग दिन दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. लोकांमध्ये या जीवघेण्या आजाराबाबत जनजागृती व्हावी हा त्यामागचा उद्देश आहे. या दिवशी लोकांना कॅन्सरविषयी माहिती देणे, त्याची लक्षणे ओळखणे, त्यावर लवकरात लवकर उपचार करून घेणे आणि प्रतिबंध करण्याचे उपाय केले जातात. जर लोकांना या आजाराशी संबंधित सर्व महत्त्वाच्या गोष्टींची माहिती असेल, तर या आजारापासून बचाव करण्यात मोठी मदत होऊ शकते.

दरवर्षी जागतिक कर्करोग दिनासाठी एक थीम निवडली जाते. जागतिक कर्करोग दिन २०२५-२०२७ची थीम युनायटेड बाय युनिक आहे, जी लोक-केंद्रित कर्करोग काळजीचे विविध आयाम आणि फरक करण्याच्या नवीन मार्गांचा शोध घेईल. जागरूकता वाढवण्यापासून ते कृती करण्यापर्यंतच्या तीन वर्षांच्या प्रवासाचा उद्देश एक सामूहिक कथा तयार करणे आहे.

युनायटेड बाय युनिक' हे घोषवाक्य हे अधोरेखित करते की लोकांच्या अनन्य कथा, गरजा, दृष्टीकोन आणि परिस्थिती आहेत ज्यांना काळजी आणि आरोग्य प्रणाली तयार करताना विचारात घेणे आवश्यक आहे, तर समुदाय आणि कर्करोगाचा अनुभव असलेले प्रत्येकजण त्यांच्या उद्दिष्टात एकजूट आहे. कर्करोगाविरूद्ध कारवाई करण्यासाठी.


४ फेब्रुवारी २००० रोजी फ्रान्समध्ये वर्ल्ड कॅन्सर कौन्सिल फॉर द न्यू मिलेनियम कर्करोगाची परिषद झाली. त्यावेळी युनेस्कोचे तत्कालीन महासंचालक कोइचिरो मत्सुरा आणि फ्रान्सचे माजी राष्ट्राध्यक्ष जॅक शिराक यांनी कॅन्सरविरुद्ध पॅरिसच्या सनदावर स्वाक्षरी केली होती. तेव्हापासून हा दिवस दरवर्षी 'जागतिक कर्करोग दिन' म्हणून साजरा केला जातो.

कॅन्सर हा असा आजार आहे ज्याला कोणीही हलक्यात घेत नाही. ही अशी स्थिती आहे ज्यामुळे मानवी शरीरातील काही स्नायू नियंत्रणाबाहेर जातात आणि शरीराच्या इतर भागात पसरतात. कर्करोग मानवी शरीरात कुठेही विकसित होऊ शकतो. प्राणघातक रोगाची चिन्हे आणि लक्षणे प्रगत अवस्थेपर्यंत दिसून येत नाहीत, त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात त्याकडे दुर्लक्ष केले जाते. कर्करोग कदाचित भीतीदायक वाटेल, परंतु त्याबद्दल स्वतः ला शिक्षित करणे हा सर्वोत्तम उपाय आहे. कर्करोगावर अद्याप कोणताही इलाज नाही, परंतु आपण त्याच्या प्रतिबंध, संशोधन आणि उपचारांबद्दल आपले ज्ञान नक्कीच वाढवू शकतो.

शरीरातील गुणसूत्र बदलांमुळे असामान्यपणे वाढणारे स्नायू गट आणि त्यामुळे होणारा रोग म्हणजे कर्करोग. हिप्पोक्रेट्स या ग्रीक विचारवंताने प्रथम ३७० इसवी सन पूर्व जगाला जागरुकता आणली. तेव्हापासून कर्करोगाने मानवाची पाठ सोडलेली नाही. तपासणीमुळे कर्करोगाचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान होण्यास मदत होते. लवकर निदान उपचारांचे यश आणि जगणे सुधारते. लसीकरण संसर्गामुळे होणाऱ्या कर्करोगांना प्रतिबंधित करते. नियमित तपासणी दीर्घकालीन कर्करोग प्रतिबंधनास मदत करते.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रामफळाचा शरीराला नेमका काय फायदा मिळू शकतो?

फळे खाणे आरोग्यासाठी खूप गरजेचे असते. त्यामुळे सहसा आपण सफरचंद, संत्री, मोसंबी, चिकू या फळांचे सेवन करतो. पण, बाजारात मिळणारी इतर फळेसुद्धा आवर्जून खायला हवीत. त्यातील एक म्हणजे रामफळ. रामफळ, ज्याला नेटेड कस्टर्ड पल किंवा वाइल्ड मिठाई म्हणूनदेखील ओळखले जाते. हे उष्णकटिबंधीय, हृदयाच्या आकाराचे फळ आहे ज्याची त्वचा हिरवी-पिवळी तर चवीला थोडे तिखट आणि गोड असते. फळाचा आतला भाग पांढरा आणि मलाईदार आहे, तर तुम्ही रोज रामफळाचे सेवन केले तर काय होईल? तुम्ही रोजच्या आहारात त्याचा समावेश केला तर तुम्हाला कोणते फायदे मिळतील? मधुमेही रामफळाचे सेवन करू शकतात का? याबद्दल जाणून घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी चर्चा केली.



चेन्नई येथील द क्लेफ्ट अँड क्रॅनिओफेशियल सेंटर आणि श्री बालाजी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या, आहारतज्ज्ञ दीपलक्ष्मी यांच्या मते, रामफळाचे दररोज सेवन केले जाऊ शकते. कारण या फळात व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी ६ सारखी पोषक तत्वे आणि पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबरसारखी खनिजे असतात. रामफळातील व्हिटॅमिन सी कंटेंट रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास योगदान, तर आहारातील फायबर नियमित आतड्यांच्या हालचालींना प्रोत्साहन देऊन नियमित पचन होण्यास मदत करतात. रामफळात असणारे अँटिऑक्सिडंट्स ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून पेशींचे संरक्षण करण्यास मदत करू शकते, तर पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, जे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

रामफळ खाणे मधुमेहींसाठी योग्य ठरेल का?

आहारतज्ज्ञ दीपलक्ष्मी यांनी सांगितले की, या फळाचा ग्लायसेमिक इंडेक्स साधारणतः कमी ते मध्यम प्रमाणात म्हणजे ५४ टक्के आहे, त्यामुळे मधुमेह असलेल्या व्यक्ती सामान्यतः हे फळ खाऊ शकतात, पण अगदी कमी प्रमाणात. या फळाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढत नाही. पण, रामफळाचे जास्त सेवन केल्यावर मधुमेह असलेल्या व्यक्तींनी त्यांच्या रक्तातील साखरेच्या पातळीचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे.

रामफळ अनेक आरोग्य फायदे देत असले तरीही संतुलित आहाराचा भाग म्हणून त्याचे सेवन करणे आवश्यक आहे.

# माथेरानमधील घोड्यांवर नियंत्रणासाठी हरित लवादाच्या सुनावणीला मुदत

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमधील घोड्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी सुनील शिंदे यांनी हरित लवादाकडे तक्रार दाखल केली होती. त्याची सुनावणी ३० जानेवारीला पार पडली. यावेळी घोडे संघटनेच्या वकिलांनी आक्षेप सादर केल्याने हरित लवादाने सुनावणीसाठी दोन आठवड्यांचा अवधी दिला आहे.

पुणे येथील राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पश्चिम विभागीय खंडपीठाने अधिसूचित पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र आणि वाहनमुक्त थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानमधील गंभीर पर्यावरणीय समस्यांची दखल घेतली. खंडपीठाने सुनील रामचंद्र शिंदे आणि अन्य एका अर्जदाराने महाराष्ट्र राज्य आणि इतर प्राधिकरणांविरुद्ध दाखल केलेल्या मूळ अर्जावर विचार केला.

न्यायाधिकरणाने नमूद केले की, सुनावणीच्या दिवशी एक संयुक्त समितीचा अहवाल रेकॉर्डवर ठेवण्यात आला होता. त्याच्या प्रती प्रतिवाद्यांना देण्यात आल्या होत्या. घोडे मालकांच्या संघटनांच्या वतीने हजर असलेल्या वकिलांनी उत्तर देण्यासाठी वेळ मागितला, कारण अहवाल त्यांना केवळ एक दिवस आधीच मिळाल्याचे त्यांनी सांगितले. खंडपीठाने आक्षेप दाखल करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदतदिली.

माथेरान हिल स्टेशन नगर परिषदेच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीबद्दलही न्यायाधिकरणाने चिंता व्यक्त केली. योग्य नोटीस बजावूनही, त्यांच्यावतीने कोणीही यावेळी हजर राहिले नाही. खंडपीठाने नगर परिषदेला एक आवश्यक पक्ष मानले आणि निबंधकांना मुख्य अधिकाऱ्यांना पत्र लिहिण्याचे निर्देश दिले. आदेशात हे स्पष्ट करण्यात आले की, पुढील तारखेला हजर न राहिल्यास संबंधित अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या हजर राहण्याचे निर्देश दिले जाऊ शकतात. महाराष्ट्र राज्य आणि पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने सांगितले की ते केवळ औपचारिक पक्ष आहेत. दोघांनीही सांगितले की त्यांच्याविरुद्ध कोणताही विशिष्ट दिलासा मागितलेला नाही. नोडल एजन्सी म्हणून काम करणाऱ्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्त समितीच्या अहवालावर अवलंबून राहण्याचा निर्णय घेतला. अहवालाचे अवलोकन केल्यानंतर, न्यायाधिकरणाने आपले निष्कर्ष नोंदवले.माथेरानच्या हवेची गुणवत्ता, संरक्षणासाठी मूळ स्रोतावरच हस्तक्षेप करणे आवश्यक आहे.

## शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आज राष्ट्रवादीत करणार प्रवेश

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील निजामपूर जिल्हा परिषद मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसने आक्रमक प्रचाराची रणधुमाळी सुरू केली असून, आता या रणांगणात खासदार सुनील तटकरे यांची तोफ धडाडणार आहे. विरोधकांकडून सातत्याने करण्यात येणाऱ्या बिनबुडाच्या, निराधार आणि खालच्या पातळीवरील आरोपांना सडेतोड उत्तर देत राष्ट्रवादी काँग्रेस जनतेसमोर सत्य मांडणार असल्याची माहिती निजामपूर जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार ॲड. राजीव साबळे यांनी दिली.

गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी या मतदारसंघात तीन भव्य जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ वाजता गांगवली, ४ वाजता निजामपूर,तर ५ वाजता विळे येथील मैदानावर खासदार सुनील तटकरे यांची जाहीर सभा होणार आहे. या सभांमध्ये केवळ भाषणच नव्हे, तर राजकीय चित्रच पालटणारे घडामोडी पाहायला मिळणार असून, शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. त्यामुळे विरोधकांच्या छावणीत प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.

या सर्व सभांना जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. राजीव साबळे, पाटणूस पंचायत समिती उमेदवार संजोग मानकर आणि निजामपूर पंचायत समिती उमेदवार गणेश पवार यांनी केले आहे.

## बुज हास्य परिवाराचा वर्धापन दिन उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली येथे बुज हास्य परिवाराचा वर्धापन दिन,पारितोषिक वितरण व सत्कार सोहळा लायन्स क्लब खोपोली येथे उत्साह पूर्व वातावरणात संपन्न झाला. ह्यावर्षीचे प्रमुख आकर्षण जागतिक किर्तीचे हास्य प्रणेते मदन कटारिया यांची स्फूर्तीदायी उपास्थिती. त्यांच्या उपस्थितीने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रसंगी मदन कटारिया यांनी हास्याचे महत्व कथन करून हास्यचे अनेक प्रकार करवून घेतले. त्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.समाजातील विशेष कार्य करणाऱ्या सेवाभावी व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात आले.नवनिर्वाचित नगराध्यक्ष-उपनगराधक्ष नगरसेवक-नगरसेविका यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.बुज हास्य परिवाराचे संस्थापक मा. बाबुभाई ओसवाल यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन यथोचित सन्मान केला. सुमारे ६५० जनसमुदाय ह्याप्रसंगी उपस्थित होता.

## माणगावच्या द.ग. तटकरे महाविद्यालयात मतदान जनजागृती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव (जि. रायगड) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रम दिनांक २५ जानेवारी २०२६ ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरित्या राबविण्यात आला. मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या प्रेरक संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी मतदान जनजागृतीची शपथ घेतली. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व अधोरेखित करत, स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन परिसरासह समाजात जाऊन प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, असे प्रभावी आवाहन केले. मतदान ही केवळ प्रक्रिया नसून नागरिकांची जबाबदारी व लोकशाहीची खरी ताकद आहे, हा संदेश या उपक्रमातून ठळकपणे पोहोचविण्यात आला. मतदानाबाबत व्यापक जनजागृती व्हावी, विद्यार्थ्यांच्या मनात लोकशाही मूल्ये रुजावीत आणि सक्रिय नागरिकत्वाची भावना विकसित व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयात विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.



यामध्ये रांगोळी स्पर्धा, मतदान जनजागृतीवरील निबंध स्पर्धा, माझे मत – अमूल्य मत या विषयावरील घोषवाक्य स्पर्धा, मतदान हा आपला हक्क या विषयावरील पोस्टर स्पर्धा, तसेच वक्तृत्व स्पर्धा यांचा समावेश होता. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडत मतदानाचे सामाजिक व लोकशाहीतील महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व अंमलबजावणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. नेहा गावडे व प्रा. स्वप्निल सकपाळ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. स्वयंसेवकांनी संपूर्ण कालावधीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाला मोठे यश मिळवून दिले. एकूणच, या मतदान जनजागृती कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तसेच समाजात मतदानाविषयी जागरूकता वाढली असून, लोकशाहीच्या सुदृढतेसाठी मताचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## बालकवी संमेलन, हस्ताक्षर स्पर्धा

**रोहा : प्रतिनिधी**



कोकण मराठी साहित्य परिषद शाखा रोहाने आयोजित केलेल्या बाल कविसंमेलन आणि सुंदर हस्ताक्षर स्पर्धा बक्षिस वितरण सोहळा रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रलचे प्रेसिडेंट आणि कोमसाप शाखा रोहाचे सचीव विजय वसंत दिवकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

प्रास्ताविक कोमसाप अध्यक्षा संध्या दिवकर यांनी शाखेबद्दल माहिती दिली.याच अनुषंगाने शाळेतील विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर अधिक सुंदर व्हावे तसेच मंगलवाडी संकुलातील लिहीणार्या चिमुकल्यांना कविता सादरीकरणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शाखेने या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सांगितले.

रोहा न. प. शाळा नं १, रोहा न.प.प्रफुल्लशेठ बारटके शाळा क्र.१०, रोहा न. प. रावसाहेब कुलकर्णी शाळा क्र. ९ या शाळेतील इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांची सुंदर हस्ताक्षर स्पर्धा दि.२७ जानेवारीला घेण्यात आली. सदर उपक्रमात एकूण ११३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा रोहा न.प. शाळा क्र. ९ येथे घेण्यात आला.

या प्रसंगी बालकांचे कविसंमेलन आयोजित केले होते.मंगलवाडी संकुलातील एकूण १३ विद्यार्थ्यांनी स्वरचित कवितांचे वाचन करून आपला सहभाग नोंदविला .शाळा क्र.१० मधील इ.चौथीतील स्पृहा संतोष धोत्रे या विद्यार्थिनीनेआजपर्यंत ५८ कविता लिहील्या आहेत.

## पिटसईच्या लोखंडे विद्यामंदिरातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**मुरुड : प्रतिनिधी**

पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळाच्या अशोक ल .लोखंडे विद्यामंदिर , पिटसई येथे रविवार दिनांक १ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावी १९९५-९६ च्या बॅचचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता.

त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष खेळु वाजे होते .सदर कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे, माजी मुख्याध्यापक संतोष रेडीज ,पर्यवेक्षक दुर्वास भोईर , विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे,संस्थेचे सर्व आजी आणि माजी पदाधिकारी , ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी ,विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते . याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक वर्ग आणि दहावीतील विद्यार्थ्यांना भेटवस्तू व शाळेसाठी वॉटर कुलर भेट देण्यात आला.



## वसंतराव नाईक महाविद्यालयात सिकलसेल सॉल्युबिलिटी तपासणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा प्राथमिक आरोग्य केंद्र व मुरुड वसंतराव नाईक महाविद्यालयातील एन. एस एस. युनिट १० व डि. एल. एल. ई च्या वतीने महाविद्यालयातील सभागृहात सिकलसेल सॉल्युबिलिटी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी महाविद्यालयाच्या ५२ विद्यार्थीनींनी सॉल्युबिलिटी तपासणी केली.

यावेळी एन. एस. एस. युनिट १० चे प्रमुख डॉ.श्रीशैल भैरगुंडे, तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा,प्रयोगशाळा तंत्रज्ञ वैशाली पाटील, औषध निर्मिता अधिकारी प्रसाद सुर्वे, आरोग्य सेविका रेश्मा साळवी, डॉ नारायण बागुल,डॉ. सुभाष म्हात्रे डॉ. सीमा नाहीद, प्राध्यापक गजानन मुनेश्वर, प्राध्यापक रुपी हसवारे,प्राध्यापक- सिध्देश सतविडकर ,प्रा. प्रणव बागवे प्रा. मुस्कान रजब आदिंसह विद्यार्थी उपस्थित होते.



तालुका सिकलसेल सहाय्यक -शालीकराव पावरा यांनी सिकलसेल सॉल्युबिलिटी आजाराविषयी सविस्तर माहिती सांगताना म्हणाले की सर्वसाधारण व्यक्तीच्या शरीरात लाल रक्त पेशींचा आकार गोल व लवचिक असतात पेशींचे आयुष्य १२०दिवस असते, पण सिकलसेल आजारामध्ये या पेशींना ऑक्सिजन मिळाला नाही तर विळयासारखे होतो, सिकलसेल पेशींचे आयुष्य हे २० ते ३० दिवस असते इंग्रजी भाषेत सिकल म्हणजे विळा सेल म्हणजे पेशी म्हणून ह्या आजारास सिकलसेल आजार असे म्हणतात सिकलसेल हा लाल पेशीमध्ये होणारा आजार आहे,

सिकलसेल लक्षणे रुग्णांनामध्ये रक्तक्षय कमी असणे, अशक्तपणा , हातापायावर सुज येणे, कमरेची व सांधेदुखी काविळ पक्षघात पित्ताशय न भरून येणार् जखमा, मूत्रपिड निकामी होणे , डोळे वर परिणाम होणे, असह्य वेदना,जंतुसंसर्ग,शारीरिक त्रास मानसिक त्रास,सिकलसेल सॉल्युबिलिटी टेस्ट ही चाचणी सिव्हिल हॉस्पिटल,ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र , उपकेंद्र, मोफत तपासणी केली जाते. तरी रुग्णानी यांचा फायदा घ्यावा असे आवाहन यावेळी तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा यांनी केले.

## मतदानाच्या दिवशी आठवडा बाजारांना बंदी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया सुरळीत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यात मतदानाच्या दिवशी आठवडा बाजारांना पूर्णवेळ बंदी घालण्यात आली असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी निर्गमित केले आहेत.

रायगड जिल्ह्यात शनिवार, दि.०७ फेब्रुवारीला मतदान तर सोमवार, दि.९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण न येता आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी, या उद्देशाने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

मतदान केंद्रांच्या परिसरात गर्दी टाळणे, वाहतुकीचा अडथळा कमी करणे आणि मतदारांना मतदानासाठी मोकळे व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे

## वाहतूक नियम भंग; चार लाख दंड वसूल

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात दि. २ फेब्रवारी रोजी २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण ५९८ इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ६,३६,७५०/-रुपये इतका दंड आकारला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-पालीखुर्द, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १/३/२ | ०-४७-७०<br>वरकस ०-१८-३०<br>पो. ख. ०-११-१०<br>एकूण ०-७७-१०<br>**पैकी ०-३८-५५** | ९.२६ | श्री. शांताराम धाया शेळके |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०३/०२/२०२६**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. ता. पनवेल जि. रायगड, मो.क्र. : ९९३०३६९८६१



### जाहीर नोटीस

दि मिडल क्लास को. ऑप.हाऊसिंग सोसायटीचे मालकीचे मैदान मध्ये सद्यस्थितीस असलेले बॅडमिंटन टेनिस पिकल बॉल कोर्ट तसेच क्रिकेटनेट व पोलीस प्रशिणासाठी मासिक तत्वावर ठरावीक वेळेकरीता भाड्याने देण्याचे ठरविले आहे तरी इच्छूकांनी दि मिडल क्लास को- ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. पनवेलमध्ये कार्यालयीन वेळात सकाळी १०.३० ते २.०० पर्यंत संपर्क साधावा.

**ठिकाण :- पनवेल**
**दि. :- ०३/०२/२०२६**

**सही/-**
**श्री. किरण नारायण मनोरे**
**सेक्रेटरी**
**द मिडल क्लास को- ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि, पनवेल जि. रायगड**



### जाहीर नोटीस

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर,
याचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल-tahasil.khalapur3@gmail.com

१) श्री. काशिनाथ गोटीराम पवार
रा. वयाळ, ता. खालापुर, जि. रायगड ...... वादी
विरुध्द
१) निबंधक, जन्म-मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी, ता. खालापूर, जि. रायगड ......प्रतिवादी

**विषयः जन्म-मृत्यु नोदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. काशिनाथ गोटीराम पवार, रा.वयाळ, ता. खालापूर, जि. रायगड (अपिलार्थी) यांच्या मुलीचा जन्म् श्रीम. ज्योत्स्ना काशिनाथ पवार दि. ०६/०२/१९८७ रोजी मौजे वयाळ, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर जन्माची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्माची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे, सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.१७/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण :- खालापूर
दिनांक : -१७/१२/२०२५
क्र.जन्म/रजि/एसआर/४४/२०२५/९१६४

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**



### जाहीर नोटीस

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर,
याचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल-tahasil.khalapur3@gmail.com

१) श्री. काशिनाथ गोटीराम पवार
रा. वयाळ, ता. खालापुर, जि. रायगड ...... वादी
विरुध्द
१) निबंधक, जन्म-मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी, ता. खालापूर, जि. रायगड ......प्रतिवादी

**विषयः जन्म-मृत्यु नोदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. काशिनाथ गोटीराम पवार, रा. वयाळ, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यानी यांची आई कै. लक्ष्मीबाई गोटीराम पवार यावा मृत्यू दिनांक ५/४/१९७१ रोजी मौजे वयाळ, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वत्तः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे, सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.१७/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण :- खालापूर
दिनांक : -१७/१२/२०२५
क्र.जन्म/रजि/एसआर/४४/२०२५/९१६५

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**



### BEFORE THE STATE CONSUMER DISPUTES REDRESSALCOMMISSION FOR MAHARASHTRA AT MUMBAI

Old Secretariats Building, Extension Building. Ground Floor, Opp Jahangir Arts Gallery, M. G. Road, Kalaghoda, Mumbai-400 032,

**Consumer Complainant No. 18/1062**
Mr. Hanumant Ankush Patil
VIS
M/S. Varsha Developers Through Partner
Mr. Vinod G. Jain & Ors.

1) Mr. Hanumant Ankush Patil .....Complainant
Residing at:- Babubhai Mhaiswala Chawl.
Room No. 4, Anand Nagar, Majaswadi, JVRL..
Jogeshwari (East), Mumbai-400060.
V/S
1) Mr. Navin A Jashnani ......Opponent No. 4
Having Office address at:-
108/109, Prajapati Arcade,
above Neel Kamal Hotel,
Opposite New Panvel Station
(East), New Panvel.
Email id: Vashadevelopers@gmail.com

**Public Notice**

TAKE NOTICE THAT the complainant above named has/have filed Consumer Complaint No. 18/1062, before, State Consumer Disputes Redressal Commission for Maharashtra at Mumbai

WHEREAS the Complaint above mentioned was listed before the Commission for the hearing/ submission but as it is not possible to serve the notice by regular service to Opponent no 4 hence the Hon'ble Commission ordered the service by substituted service i.e.Public Notice

Notice is hereby given to Opponent no. 4, that if you wish to contest the Complaint you are required to remain present on **02/03/2026. at 10.30 am** in person or by pleader duly instructed and produce the documents in your defense on which you desire to rely on

TAKE FURTHER NOTICE THAT in default of your appearance on the date and time above mentioned the Complaint will be proceeded for determination in your absence and no further Notice in relation thereto shall be given Given in my hand on this **13 Day of jan. 2026**

SeL

**sd/-**
**Registrar (Legal)**
**State Consumer Disputes Redressal Commission Maharashtra. Mumbai**

# स्वच्छ सर्वेक्षणासाठी नवी मुंबई मनपा सज्ज

## मार्गदर्शक तत्वांच्या कार्यवाहीचा आयुक्तांनी घेतला आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

‘स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६’ विषयी स्वच्छ भारत मिशनच्या वतीने ‘मार्गदर्शक तत्वे’ जाहीर करण्यात आलेली असून त्यांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत करावयाच्या कार्यवाहीचा आढावा महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत घेतला. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.राहुल गेठे आणि इतर विभागप्रमुख, अधिकारी उपस्थित होते.



कृती आराखडयात नमूद बाबींच्या अनुषंगाने स्वच्छ सर्वेक्षणामध्ये केवळ गुणांकनाकरिता नाही तर केलेल्या कामाचे आपल्याला संपूर्ण समाधान मिळेल अशाप्रकारे नियमीत स्वच्छता कामे हाती घ्यावीत व स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक यांच्यापासून ते उच्च अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करुन द्यावी असे निर्देश आयुक्तांनी दिले. याविषयी माहितीपुस्तिका तयार करुन ती प्रत्येक घटकाला उपलब्ध करुन द्यावी असेही त्यांनी सूचित केले.

या वर्षीपासून स्वच्छ भारत मिशनच्या वतीने ’स्वच्छ शहर जोडी’ उपक्रमांतर्गत देशातील १९६ शहरांना मार्गदर्शन करण्यासाठी एकूण ७२ मार्गदर्शक शहरांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये ’सुपर स्वच्छ लीग’ मध्ये समाविष्ट नवी मुंबई महानगरपालिका शहरास महाराष्ट्र राज्यातील लोणार, केज, मलकापूर, जिंतूर, कन्नड – या ५ नगरपरिषदा स्वच्छ शहर जोडीमध्ये देण्यात आलेल्या आहेत. या स्वच्छ शहर जोडी असलेल्या ५ शहरांकरिता नवी मुंबई महानगरपालिकेचे ५ नोडल अधिकारी नेमण्यात यावेत आणि त्यांनी आगामी २ महिन्यात या शहरांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना स्वच्छतेतील प्रगतीबाबत मार्गदर्शन करावे अशा सूचना आयुक्तांनी केल्या. त्यानंतर स्वत: आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उच्चस्तरीय अधिकारी या शहरांना भेट देतील असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

महामार्गांच्या स्वच्छतेकडे अधिक काटेकोरपणे नियमित लक्ष द्यावे व या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमांची व्याप्ती वाढवावी असे निर्देश देतानाच रेल्वे स्टेशन व परिसर सिडकोच्या अखत्यारित येत असल्याने येथील स्वच्छतेबाबत सिडकोकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करावा आणि स्वच्छता करून घ्यावी अशाही सूचना आयुक्तांनी या वेळी दिल्या.

मार्केटमधील स्वच्छतेबाबत तेथील विक्रेत्यांनी खबरदारी घेण्याविषयी त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी सतत मोहीमा राबवाव्यात व त्यामध्ये सातत्य राखावे अशा सूचना देतानाच मासळी मार्केटमध्ये स्वच्छता राखण्यासाठी स्टिलच्या टेबलचा वापर करण्याबाबत कार्यवाही करावी असे सूचित करण्यात आले. प्लास्टिक पिशव्यांच्या वापर नागरिकांनी थांबवावा याकरिता नियमितपणे जनजागृती करत राहावी तसेच प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवायादेखील अधिक प्रभावीपणे राबवाव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

स्वच्छताकर्मी हा अत्यंत महत्वाचा घटक असून त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या हजेरी शेड सुव्यवस्थित असल्याची खात्री करणे तसेच त्या ठिकाणी प्रथमोपचार व्यवस्था, महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था अशा आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध असण्याबाबत कार्यवाही करावी. त्यांना काम करताना वापरायची सुरक्षा साधने मिळाली आहेत का व त्यांच्याकडून त्याचा वापर केला जात आहे काय, वापर होत नसेल तर न वापरण्यामागची कारणे जाणून घ्यावीत व त्यामध्ये सुधारणा करावी, असेही निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

### मोहिमांमध्ये सातत्य राखण्याचे आवाहन

रस्ते, रस्त्यांच्या बाजूच्या जागा, उड्डाणपूल, उड्डाणपूलाखालील जागा, दुभाजक, बॅकलेन, मैदाने या ठिकाणांच्या स्वच्छतेसाठी राबविण्यात येत असलेल्या मोहीमांमध्ये सातत्य राखावे असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले. सध्या मैदानांच्या स्वच्छतेकडे लक्ष दिले जात असून त्यामध्ये नियमितता राखावी व मैदानांच्या कडेला कचरापेट्या ठेवण्यात याव्यात, असे निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले.

# भाजपच्या उमेदवारांची प्रचारात जोरदार आघाडी

**उरण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व उरण पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चिरनेर जिल्हा परिषद गट तसेच चिरनेर पंचायत गणातील व आवरे पंचायत गणातील भाजप महायुतीच्या उमेदवारांचा दिवसेंदिवस प्रचार शिगेला पोहचला असून, प्रचारात अनेक विकास कामांच्या मुद्द्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे भाजप महायुतीच्या उमेदवारांना नागरिकांचा उदंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विकासाच्या मुद्द्यावर आधारित ही निवडणूक होणार असल्याचा ठाम विश्वास मतदारांकडून व्यक्त होत आहे.

चिरनेर जिल्हा परिषद गटातून सामाजिक प्रश्नांची जाण असलेले देवेंद्र विनायक पाटील व चिरनेर पंचायत गणातून साक्षी सुजित पाटील तर आवरे पंचायत गणातून नीलिमा निलेश म्हात्रे हे राजकीय वारसा लाभलेले कार्यक्षम व विकासाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.


या तिन्ही उमेदवारांची निशाणी कमळ आहे. मतदार संघातील जनतेशी चांगले ऋणानुबंध असलेल्या या उमेदवारांचा दांडगा जनसंपर्क असून, नागरिकांच्या सुखदु:खात प्रत्यक्ष सहभागी होणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख पंचक्रोशीत आहे. गेल्या काही दिवसापासून सुरू असलेल्या जनसंपर्क मोहिमा, घरभेटी, बैठका यातून त्यांच्या प्रचाराचा झंझावात दिसून येत आहे. चिरनेर व आवरे मतदार संघातील ग्रामस्थांनी पारदर्शक नेतृत्व व कारभार आणि सर्वांगीण विकास या त्रिसूत्रीवर भाजप महायुतीच्या उमेदवारांना नागरिकांनी पसंती दिल्याचे स्पष्ट चित्र सध्या दिसून येत आहे.

महिलावर्ग युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्येही भाजप महायुतीच्या उमेदवारांविषयी सकारात्मक भावना असून सर्व स्तरातून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून उरण पनवेलमध्ये आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर यांनी अनेक विकासाची कामे केली आहेत. नवीन विकास कामांचा विचार करता, लोकांची जाण असलेले व काम करण्याची सकारात्मक मानसिकता बाळगणारे भाजप महायुतीचे उमेदवार या निवडणुकीत यश संपादन करतील असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

या निवडणुकीत मतदार संघातील सर्व उमेदवारांना निवडून आणण्यासाठी तरुणांची फौज कामाला लागली असून भाजप महायुतीच्या उमेदवारांची ताकद वाढली आहे.



# वीर वाजेकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात ’सायन्स असोसिएशन’ मार्फत विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांसाठी ’करिअरच्या संधी’ या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून तळोजा येथील श्रीकेम लॅबचे उपाध्यक्ष डॉ. व्यंकटेश कटगिरी उपस्थित होते. त्यांनी नवी मुंबईतील तळोजा, तुर्भे आणि पातळगंगा यांसारख्या मोठ्या औद्योगिक पट्ट्यांमध्ये विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या रोजगाराच्या संधींची सविस्तर माहिती दिली.

या वेळी मार्गदर्शन करताना डॉ. कटगिरी म्हणाले की, प्रशिक्षित असणे काळाची गरज आहे. जर उद्योगांमधील संधींचे सोने करायचे असेल, तर तरुण पिढी केवळ पदवीधर असून चालणार नाही, तर ती तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित असणे आवश्यक आहे. फार्मा सेक्टरमधील संधी बाबत त्यांनी माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी पुरेशी नसून, कौशल्य आत्मसात केल्यास नोकरी मिळवणे सोपे होते, असे आवाहन त्यांनी केले.

उपप्राचार्य तथा कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अनिल पालवे यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. या वेळी डॉ. गुरुमीत वाधवा, चेतना तुंबडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारती विद्यापीठात शैक्षणिक आणि कलात्मक प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे बी.व्हॉक इंटीरियर डिझाईन विभागाच्या वतीने २९ व ३० जानेवारी २०२६ रोजी भव्य शैक्षणिक व कलात्मक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन संचालक विलासराव कदम यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाला आर्किटेक्ट व प्राचार्य प्रा. सतीश ढाले प्रमुख उपस्थित राहणार आहेत.



या प्रदर्शनाचे संपूर्ण नियोजन, संकल्पना व यशस्वी अंमलबजावणी बी.व्हॉक इंटीरियर डिझाईन विभागप्रमुख प्रा. वृषाली दत्तात्रय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यावसायिक दिशा देणे, डिझाईन प्रक्रियेची सखोल समज निर्माण करणे तसेच प्रत्यक्ष सादरीकरणासाठी त्यांना प्रेरित करणे, यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे प्रदर्शनाला विशेष उंची प्राप्त झाली आहे.

या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांच्या स्टडी टूरवर आधारित विशेष ‘स्टडी टूर एक्झिबिशन’देखील सादर करण्यात आली असून त्यामध्ये प्रत्यक्ष भेटी, अभ्यास, निरीक्षणे व अनुभवांचे डिझाईन स्वरूपात रूपांतर करण्यात आले आहे. यासोबतच इंटीरियर डिझाईनशी संबंधित विविध संकल्पनांवर आधारित मॉडेल्स, लेआउट्स, मटेरियल स्टडी, थीम आधारित डिझाईन्स व सादरीकरणे पाहायला मिळत आहेत.


या दोन दिवसांच्या प्रदर्शनाला १००० हून अधिक विद्यार्थी, पालक, डिझाईन व्यावसायिक व अभ्यागतांनी भेट दिली, ज्यामुळे प्रदर्शनाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे मेहनत घेतली असून या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि व्यावसायिक दृष्टिकोन अधिक बळकट झाला आहे.

कॉलेजच्या व्यवस्थापनाने अशा शैक्षणिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत विभागप्रमुख प्रा. वृषाली दत्तात्रय कांबळे, सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# मोठी जुई शाळा परसबाग स्पर्धेत उरण तालुक्यात प्रथम

**उरण : बातमीदार**

निसर्गाचे महत्त्व आणि शेतीची आवड विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेत उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मोठीजुई शाळेने देदीप्यमान यश मिळवले आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी लावलेल्या अथक परिश्रमाचे फळ म्हणून शाळेला २०२५–२६ या वर्षी स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मान मिळाला आहे. या अगोदरदेखील शाळेला प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.



महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग दरवर्षी शाळांसाठी परसबाग स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित शाळांनी सहभाग घेतला होता, मात्र मोठीजुई शाळेच्या परसबागेने (Kitchen Garden) भाजीपाला, फुलझाडे, मसाल्याचे पदार्थ आणि औषधी वनस्पतींच्या लागवडीतील वैविध्य तसेच बागेची उत्तम निगा राखण्याच्या निकषांवर परीक्षकांची मने जिंकली.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी या यशाचे श्रेय विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांना दिले आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ शेतीचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळाले नाही, तर त्यांच्यात जबाबदारीची आणि निसर्गाबद्दलची आस्था देखील वाढली, असे मत मुख्याध्यापकांनी व्यक्त केले.

शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्थानिक ग्रामस्थांनी, शाळा व्यवस्थापन समितीने आणि शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे तोंडभरून अभिनंदन केले आहे. या यशामुळे मोठीजुई शाळेने तालुक्यात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. सदर परसबागेसाठी उपक्रमशील शिक्षक अविनाश नवाळे, कौशिक ठाकूर, यतीन म्हात्रे, विश्वनाथ गावंड, दर्शन पाटील, अंकुश पाटील, शर्मिला पाटील, काजल पाटील यांनी मेहनत घेतली.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका विभागामार्फत अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई मनपा कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत ऐरोली येथे अनधिकृत बांधकामांस जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

अनधिकृत बांधकाम नैनेश एस. बदले, सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले. तसेच १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. मोहिमेसाठी अधिकारी / कर्मचारी, मजूर –१०, ब्रेकर–२, गॅसकटर–१, घण– २ तसेच पोलीस तैनात होते.

# साहित्यिक नागनाथ डोलारेंच्या पुस्तकांचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद (शाखा पनवेल) आणि पंचशील तरुण मंडळ (सावरगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य सोहळ्यात ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ श्रीपती डोलारे यांच्या ’मानवतेचे सिंहासन’ आणि ’लावण्यलेणी’ या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा झाला.



या सोहळ्यात नागनाथ डोलारे यांच्या ’विधवा महिला’ या प्रबोधनात्मक कवितेचे विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद को.म.सा.प.चे विश्वस्त प्रा. एल. बी. पाटील यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा न्यायाधीश डॉ. यशवंत चावरे, विद्रोही कवी प्रा. राहुल तागडे, मा. शिवदास महाजन (निवृत्त न्यायाधीश), आणि माजी शिक्षण सहसंचालक मा. रोहिदास पोटे उपस्थित होते. तसेच प्राचार्य भगवान माळी, डॉ. सुनील कांबळे आणि ज्येष्ठ साहित्यिका ड. सुनिता जोशी यांनीही मार्गदर्शन केले.

या सोहळ्यात विविध राज्यांतील मान्यवर साहित्यिकांचा गौरव करण्यात आला. त्यात प्रामुख्याने मधू बावलकर, सुभाष मानवटकर, गणेश कोळी, चंद्रप्रकाश देगलूरकर, नागोराव सोनकुसरे, दिलीप नेवसे पाटील (सावित्रीबाई फुले यांचे पाचवे वंशज), वैशाली मून यांचा समावेश होता.

प्रकाशन सोहळ्यानंतर झालेल्या खुल्या कविसंमेलनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. सूत्रसंचालन मा. हरिश्चंद्र फडके यांनी केले, तर नियोजनासाठी ॲड. सुनिता जोशी, अर्चना डोलारे, सुभाष कुरणे यांनी परिश्रम घेतले.

# विसपुते कॉलेजमध्ये रविवारी रोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, आदर्श शिक्षण समूह संचलित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज, नवीन पनवेल, पदवीधर प्रकोष्ठ, भाजप आणि युवा शक्ती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी पनवेल नगरीत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अधिकाधिक विद्यार्थ्यांनी, पदवीधरांनी व रोजगार इच्छुकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे चेअरमन धनराज विसपुते तसेच प्राचार्य डॉ. सीमा कांबळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९६०७९६५७४२, ८८७९३३८८३३, ९९३०३९४४७५ तरुणाईच्या आशा–आकांक्षांना बळ देणारा हा मेळावा पनवेलच्या विकास प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# घारापुरी येथे भाजप महायुतीचा जोरदार प्रचार

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांनी आपला प्रचार सुरू केला आहे.



नवघर जिल्हा परिषद गट उमेदवार प्रभादेवी राजाराम भोईर नवघर पंचायत समिती गणचे उमेदवार हरेश गंगाधर भोईर यांनी मंगळवार (दि. ३) रोजी घारापुरी येथे घारापुरी माजी सरपंच तथा भाजप नेते राजेंद्र पडते यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचार केला.

या वेळी भाजप नेते राजेंद्र पडते, विकास भोईर, सीमा घरत, पंचायत समिती सदस्य दीपक ठाकूर, फुंडे ग्रामपंचायत सदस्या कविता म्हात्रे, परेश भोईर, नितीन पाटील, हनुमान कोळीवाडा माजी सरपंच गौरव कोळी, करिष्मा भोईर, आशा भोईर, नम्रता पाटील, जयवंत भोईर, पुरेश पाटील, भाई पाटील, महावीर पाटील, परेश भोईर, सुशील भोईर आदी सहभागी झाले होते.

# करंजाडी जिल्हा परिषद गटात भाजप उमेदवारांची प्रचारात मुसंडी

**महाड : प्रतिनिधी**

माजी मंत्री स्व. प्रभाकर मोरे यांच्या महाडच्या विकासाचे स्वप्न घेऊन त्यांचा पुत्र अमित मोरे भाजपाच्या माध्यमातुन जनतेची सेवा करण्यासाठी पुन्हा आला आहे. हीच खरी वेळ आहे बदल करण्याची, आता जनतेनेच निवडणूक हातात घ्यावी आणि गुंडगिरीला हद्दपार करून भाजपच्या अमित मोरे यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन नामदार प्रवीण दरेकर यांनी करंजाडी जिल्हा परिषद मतदार संघातील प्रचारादरम्यान केले.





रायगड जिल्हा परिषद निवडणुकीच्या महाड तालुक्यातील करंजाडी जिल्हा परिषद गटामध्ये भाजपचे उमेदवार माजी मंत्री प्रभाकर मोरे यांचे चिरंजीव माजी जिल्हा परिषद सदस्य अमित मोरे हे निवडणुकीच्या रिंगणात असून दस्तूर खुद्द नामदार प्रवीण दरेकर दोन दिवसापासून त्यांच्या प्रचाराची धुरा सांभाळत आहेत. प्रवीण दरेकर यांच्या झंजावाताने संपूर्ण करंजाडी सह विन्हेरे विभागात मोरे यांनी प्रचारामध्ये प्रचंड मुसंडी घेतल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान यावेळी होत असलेल्या गाव बैठकांवर नामदार प्रवीण दरेकर यांनी जनतेला आवाहन करत माजी मंत्री प्रभाकर मोरे यांचे स्वप्न साकार करायचं असेल आणि या विभागाचा खऱ्या अर्थाने विकास घडवायचा असेल तर विन्हेरे विभागातील जनतेने त्यांचे आशीर्वाद अमित सोबत ठेवावेत व स्व प्रकारजी मोरेंना यांच्या या वारसाला तुमची सेवा करण्याची संधी तुम्ही द्यावी अशी कळकळीची विनंती ना प्रविण दरेकर यांनी प्रचार बैठकांदरम्यान केली.

दरम्यान या वेळी त्यांच्यासोबत माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, उमेदवार अमित मोरे, राष्ट्रवादीचे हनुमंत जगताप व श्रीधर सकपाळ, भाजपाचे नागेंद्र राठोड यांच्या सहसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, या वेळी दरेकर म्हणाले की तुम्ही जर आमच्या उमेदवाराला निवडून दिलेत तर मी मोठ्या प्रमाणावर विकास निधी उपलब्ध करून देईन. मी तुम्हाला शब्द देतो तुम्ही मला विश्वास द्या, असे आवाहन प्रवीण दरेकर यांनी या वेळी जनतेला केले.

# प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी निवडणूक आयोगाच्या सूचना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मतदान व मतमोजणी केंद्रावरील प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी दक्षता घेण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात सूचना दिल्या आहेत. कुठल्याही मतदान केंद्रावर किंवा मतमोजणी केंद्रावर प्रवेशिकेशिवाय प्रवेश करता येणार नाही.

प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी थेट मतदान केंद्रावरील मतदान कक्षाजवळ जावून पाहणी करणे किंवा छायाचित्रे,छायाचित्रण करणे, प्रतिबंधित आहे. मतदार मतदान करतानाचे छायाचित्र किंवा छायाचित्रण पुरेशा/निर्देशित अंतरावरुनच करणे बंधनकारक असेल. ते करतानाही मतदानाच्या गोपनीयतेच्या हक्काचे उल्लघंन होता कामा नये.

प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना दिलेली प्रवेशिका रद्द करण्याचे अधिकार यथास्थिती संबंधित जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी अथवा राज्य निवडणूक अधिकाऱ्यांस असतील. मतदान व मतमोजणी केंद्रावरील संबंधित अधिकारी/ कर्मचारी प्रवेशिकेची उचित पडताळणी करुनच प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान/मतमोजणी केंद्रावर प्रवेश देतील.

कुठल्या मतदाराने कोणत्या उमेदवाराला मतदान केले आहे, हे मतदानाच्या वेळी किंवा मतमोजणीप्रसंगी अपघाताने चित्रित झाल्यास किंवा त्याचे छायाचित्र काढल्यास त्याचे प्रसारण किंवा प्रसिद्धी करता येणार नाही. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान/मतमोजणी केंद्रावर छायाचित्रासाठी किंवा छायाचित्रणासाठी कॅमेराचे स्टँड नेता येणार नाही. राज्य निवडणूक आयोग / संबंधित जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी नेमलेला अधिकृत छायाचित्रकार किंवा कॅमेरामन यांनाच मतदान केंद्रात व मतमोजणी केंद्रात कॅमेराचे स्टँड नेता येईल.

मतदान किंवा मतमोजणी केंद्रावर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींची एकाच वेळी होणारी गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार गटागटाने सर्वांना आत सोडण्याबाबतचे किंवा परिस्थितीनुरुप नियोजन करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांना असतील. सर्व प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी या सूचनांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन केले गेले आहे.

# श्री वेताळ देवस्थानचा अभिषेक सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद क्षेत्रातील भिसेगाव येथे श्री वेताळ देवस्थान ग्रामस्थांचे दैवत असल्याने पौर्णिमे निमित्त सालाबाद प्रमाणे यंदाही उत्सव करण्यात आला. या उत्सवाला अनेक भाविक भक्तांनी आणि मान्यवरांनी दर्शन घेऊन प्रसादाचा लाभ घेतला आहे. तसेच अभिषेक सोहळा थाटात पार पडला.



श्री वेताळ देवस्थान पूर्वापार असलेले मंदिर आहे. पूर्वी एका उंबराच्या झाडाखाली हे देवस्थान होते. तेथे जाण्यासाठी डोंगरावर कच्चा रस्ता होता. स्वयंभू असलेले हे देवस्थान कडक असून हा देव पावणारा असल्याने दर अमावास्या व पौर्णिमेला दर्शन घेण्यासाठी येथे भाविक येत असतात.सफेद रंगाचे कपडे धारण करुन, हातात तलवार, सफेद घोड्यावर स्वार होऊन पंचक्रोशीतील भाविकांचे रक्षण करीत असतो देवाला पुरणपोळी – दही – भाताचा नैवेद्य दिला जातो. रात्री बारा नंतर श्री वेताळ देव डोंगरावर फिरत असतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

या प्रसंगी नगरसेवक विजय हजारे, पोलिस पाटील संजय हजारे, मंगेश परदेशी, पंढरीनाथ लबडे, रोहित बोराडे, साईश फाटक, स्वराज जुनघरे, अतुल ठोंबरे, ऋषिकेश भोसले, सुनील देशमुख, मोहन भोईर, देवेंद्र हजारे, ऋषिकेश यादव, मयुरेश चौधरी, रेश्मा बताले, पंढरीनाथ बोराडे, सुरेश हजारे, सुरेश सावंत , ओम पाटील, राहुल हजारे , किरण खैरनार , सुनिल ठाकुर, विजय जाधव, हर्षल लाड, श्रीराम दिसले, जितेंद्र कडू, निवास जंजीरकर आदी उपस्थित होते.

# किशोर जैन आणि समृद्धी कोळी यांना मुस्लिम महिलांकडून प्रतिसाद

## मोहल्ल्यातून मताधिक्य देण्याचा निर्धार

**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप युतीचे नागोठणे जिल्हा परिषद गटातील उमेदवार किशोरभाई जैन व नागोठणे पंचायत समिती गणातील उमेदवार समृद्धी संतोष कोळी यांच्या प्रचारार्थ नागोठणे मुस्लिम मोहल्ल्यात सोमवारी (दि.२) सायंकाळी मुस्लिम महिलांचा घेण्यात आलेल्या मेळाव्याला महिला वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन किशोरभाई जैन व समृद्धी कोळी यांना नागोठणे मुस्लिम मोहल्ल्यात भरघोस मताधिक्य देणार असल्याचा निर्धार यावेळी मुस्लिम महिलांनी केला.





दरम्यान, मेळाव्याला उपस्थित महिला वर्गाशी नामदार अदितीताई तटकरे व आमदार सना मलिक यांनी मोबाईल द्वारे संवाद साधून किशोरभाई जैन व समृद्धी कोळी यांना निवडून देण्याचे आवाहन करून लवकरच मी आपल्या मुस्लिम महिलांची भेट घेऊन आपल्या अडीअडचणी सोडविणासाठी कटीबद्ध असल्याचे आमदार सना मलिक यांनी आश्वासित केले. तसेच नामदार तटकरे यांनी लाडकी बहीण योजने संधर्भातील महिला वर्गात जो काही गैरसमज होता तो दूर करून राष्ट्रवादी पक्ष सर्व धार्मियांना सोबत घेऊन विकास कामे करणारा पक्ष असल्याचे नमूद केले. दरम्यान, मेळाव्यातील मुस्लिम महिलांची गर्दी पाहून मुस्लिम मोहल्ल्यात आम्हीच वरचढ आहोत असे समजणाऱ्यांना चांगलाच चाप बसल्याची चर्चा मुस्लिम मोहल्ल्यात चालू आहे.

नागोठणे मुस्लिम मोहल्ल्यातील मुस्लिम महिलांच्या मेळाव्यावेळी उमेदवार किशोरभाई जैन व समृद्धी कोळी, राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, शिवरामभाऊ शिंदे, संतोष कोळी, संजय भोसले, डॉ. मिलिंद धात्रक, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, उपसरपंच अकलाख पानसरे, संगिता जैन, ग्रामपंचायत सदस्या जन्नत जोयेब कुरेशी, पुनम काळे, भाविका गिजे, ज्ञानेश्वर साळुंखे, ॲड.प्रकाश कांबळे, माजी सदस्य दिलनवाज अधिकारी, जोयेब कुरेशी, समिर भिकन, काझीम पानसरे, मनोज टके, शराफत कडवेकर, उमेर सांगडे, आशा शिर्के, सुजाता जवके, अमिता शिंदे, नेत्रा पारंगे, दक्षता शहासने, अपर्णा सुटे, फातिमा सय्यद, तबस्सूम कडवेकर यांच्यासह राष्ट्रवादी व भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व बहुसंख्य मुस्लिम महिला भगिनी उपस्थित होत्या.

# अजितदादांचा अस्थिकलश दर्शनानंतर कर्जतहून खोपोलीकडे रवाना

**कर्जत : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या निधनानंतर शोकसागरात बुडालेले कार्यकर्ते आणि राज्यातील जनता अजूनही दुःखात आहे. पवार यांच्या अस्थी असलेला कलश कर्जत तालुक्यात आल्यानंतर शेकडो नागरिक तसेच कार्यकर्त्यांनी अस्थी कलशाचे दर्शन घेतले. त्यानंतर हा अस्थी कलश फुलांनी सजवलेल्या रथामधून खोपोली येथे नेण्यात आला त्यावेळी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारानंतर एकत्रित करण्यात आलेल्या अस्थी यांचे दर्शन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सार्वजनिक केले आहे. रायगड जिल्ह्यासाठी बारामती येथून निघालेला रथ काल कर्जत येथे आला होता. हा अस्थी कलश आज कर्जत तालुक्यातील कार्यकर्त्यांना दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांनी कर्जत येथून हा अस्थी कलश फुलांनी सजवलेल्या रथामधून खोपोली नंतर खालापूर, पेण असा पुढे रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कार्यकर्त्यांना अंतिम दर्शन घेण्यासाठी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती दिली. तसेच श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे त्या अस्थींचे विसर्जन करण्यात येणार असून रायगड जिल्ह्यातील कार्यकर्ते तेथे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती दिली.

कर्जत येथील राष्ट्रवादी भवन येथे अस्थी कलश दर्शनप्रसंगी जिल्हा कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, जिल्हा सरचिटणीस एकनाथ धुळे, विलास माळी, मधुकर घारे, पुष्पा दगडे, संतोष पाटील, महेंद्र चंदन, अशोक राऊत, कुमेश मोरे, मधुरा चंदन, भारती पालकर, सुवर्णा निलधे, अंजली कडू, सुमिता गायकवाड, सुचिता खोत, स्नेहा शिंदे, मानसी कानीटकर, स्वाती कदम, मनिषा ठोंबरे, चित्रा शितोळे, अंजली ठाकरे आदी उपस्थिती होते. हा रथ कार्यकर्त्यांच्या अनेक गाड्यांच्या ताफ्यासह खोपोली खालापूर येथे निघाला. आता हा रथ पुढील काही दिवस जिल्ह्यातील तालुक्यात व प्रमुख शहरांमध्ये नेला जाणार आहे.



**अलिबाग : महादेव कोळी समाजातर्फे श्री मल्हारी मार्तंड देवाच्या उत्सवानिमित्त श्री खंडोबा देवाची पालखी निघाली. यामध्ये भाविक सहभागी झाले होते.** (छाया : जितू शिगवण)

# कोएसो खंडाळे माध्यमिक शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील नेहुली – खंडाळे येथील को ए सो माध्यमिक शाळेंच्या सन १९९२ साली इयत्ता १०वी या वर्गात शिकणाऱ्या माजी विद्यर्थी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा नुकताच बेलकडे येथिल पोसायडन्स रिसॉर्ट ला पार पडला. हे माजी विद्यर्थी आणि त्यांना त्यावेळी शिकविणारे शिक्षक जवळजवळ ३४ वर्षानंतर पुन्हा एकदा एकत्र आले होते.



या वेळी शाळेतील तत्कालीन शिक्षक एस. के. म्हात्रे, कुंदा ठाकूर, रवींद्र ठाकूर आणि कुंभार सर आणि माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या वेळी आयोजित कार्यक्रमात अनेकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत १९९२ पासुन १९२६ पर्यंतचा प्रवास आपापल्या मनोगतात व्यक्त केला. यामुळे शाळेतील जुने दिवस जुन्या आठवणी असे एक एक क्षण त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहिले होते. प्रत्येकानी आपल्या मनोगतात शिक्षकांबद्दल कृतघ्नता व्यक्त केली. दुपारी पेण येथिल प्रसिद्ध गायक संतोष पाटील यांच्या गायनाच्या कार्यक्रमात माजी विदयार्थ्यांनी पण गाणी गाऊन धमाल केली.

सदर स्नेहसंमेलनाला सतीश समुद्रे, प्रसाद पाटील, समीर मालोदे, संजय वेंगुर्ले कर, बंटी चव्हाण, महेश घरत, सुनील समुद्रे, राजश्री दाबके, कांचन पाटील, शैलेश पेडणेकर, प्रसाद नाईक यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. माजी विद्यार्थी उमेश पाटील याने अतिशय सुश्राव्य सूत्रसंचालन केले.

# रातवड येथील शाळेस बेंचेससह क्रीडा साहित्य भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

मेवाड नवयुवक मंडळ, मुंबई यांच्या वतीने छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर, रातवड या विद्यालयास २१ नवीन बेंचेस तसेच क्रीडा साहित्याची भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शारीरिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

या कार्यक्रमास मेवाड नवरत्न मंडळाचे अध्यक्ष विजेश पामेचा, मंत्री सुमित धाकड, कोषाध्यक्ष गौतम बोहरा, कमिटी मेंबर कपिल पामेचा व लोकेश कोठारी तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम व शिक्षकवृंद उपस्थित होते .



सदर बेंचेस व क्रीडा साहित्य सामाजिक कार्यकर्ते कृष्णाजी महाडिक यांच्या विशेष प्रयत्नातून विद्यालयास प्राप्त झाले. या वेळी संस्था पदाधिकारी अध्यक्ष डॉ.नंदकुमार जोशी, सरचिटणीस डॉक्टर निलेश रेवगडे व पदाधिकारी, विद्यालय मुख्याध्याक संतोष कदम यांनी मेवाड नवरत्न मंडळ मुंबई तसेच कृष्णाजी महाडिक यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# खोपोलीत हॅप्पी स्कूल कार्यक्रम



**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हिल क्लबच्या माजी जिल्हा अध्यक्षा डॉ सावित्री रघुपती यांच्या हस्ते खोपोलीच्या छत्रपती शाहू महाराज शाळेत हॅप्पी स्कूल अशा कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. शाळेतील दहावी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी कशाप्रकारची तयारी करावी लागते या संदर्भात हिंदवी शाह हिने प्रशिक्षण दिले.

१५० विद्यार्थ्यांना पेन व बिस्कीट वाटप करण्यात आले. तसेच शाळेत स्पोर्टचे सामान, विविध पुस्तके, शाळेसाठी २ व्हाईट बोर्ड, तसेच शाळेत बोलक्या भिंती रंगवून दिल्या गेल्या. हे सर्व काम इनरव्हिल क्लब खोपोली व क्लब मधील सर्व सदस्यांनी केलेल्या डोनेशन मधून केले गेले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष दिना शहा, आय पी पी जयश्री कलोशी, सेक्रेटरी मधुमिता पाटील, पास्ट डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ सावित्री रघुपती, आय एस ओ वर्षा शिवलकर, एक्झिक्युटिव्ह मेंबर्स दिव्या मश्रु, रमिला पटेल, पास्ट प्रेसिडेंट सारिका धोत्रे, मेंबर्स अरुणा, डॉ.अर्चना जाखोटिया, तारा आणि मनीषा उपस्थित होते, तसेच शाळेचे मुख्याध्यापक बिचकर सर व शाळेतील इतर स्टाफ उपस्थित होते.

# सुधीर नाझरेंचे छायाचित्र संस्कृती आर्ट फेस्टिवलमध्ये अव्वल

**मुरूड : प्रतिनिधी**

ठाणे संस्कृती आर्ट फेस्टिवलमध्ये पंढरपूर वारी या विषयावर राज्यभरातून छायाचित्र स्पर्धेसाठी मागवण्यात आली होती. हजारो चित्रातून सुधीर नाझरे यांच्या चित्राला प्रथम क्रमांकचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

नाझरे हे निसर्ग चित्र, विविध ठिकाणी स्वतः भेट देऊन नाविन्यपूर्ण संस्कृती फोटो घेण्यासाठी नेहमीच पुढे असतात.त्यांना आतापर्यंत त्यांच्या उत्कृष्ट फोटो बद्दल अनेक पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे.त्यांनी या



स्पर्धेत प्रथम क्रमांकाबरोबरच त्यांनी काढलेल्या इतर फोटोना सुद्धा २ इतर पूरस्कार आज जाहीर झाले आहेत ११ हजार रोख व सन्मान चिन्ह देऊन ९ फ़ेब्रुवारीला २०२६ रोजी ठाणे उपवन आर्ट गॅलरी येथे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे .

आळंदी व देहू येथून माऊलींची व तुकारामाची पालखी पंढरपूरला पायी वारकरी वारी करतात त्यावेळचे जिवंत अनुभव टिपण्याचे काम सुधीर नाझरे यांनी केले आहे.

गेली १५ वर्ष वारीचे छायाचित्रण करत असल्याने वारीतील प्रत्यक्ष क्षणाचे फोटो त्यांनी संग्रहित केले आहेत. त्यांना प्रथम क्रमांक मिळताच अनेक मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# भारताचा अमेरिकेवर विजय

## टी-२० वर्ल्डकप सराव सामन्यात जगदीशनचे शतक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारताच्या अ संघाने टी-२० विश्वचषक २०२६ वॉर्म अप सामन्यात अमेरिकेवर ३८ धावांनी विजय मिळवला. नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर रंगलेल्या या सामन्यात टीम इंडियाने अमेरिकेला विजयासाठी २० षटकांत २३९ धावांचे आव्हान दिले होते. त्यानंतर भारताने अमेरिकेला १९.४ षटकांत २०० धावांवर सर्वबाद केले.



टी-२० विश्वचषक येत्या ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. भारतीय संघ अमेरिकेविरुद्ध सामन्याने सुरुवात करणार आहे. तत्पूर्वी अमेरिकेचा संघ सराव सामने खेळत आहेत. तिलक वर्माला न्यूझीलंडविरूद्ध टी-२० मालिकेपूर्वी दुखापत झाल्याने त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. यामुळे तो पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेला मुकला होता, पण आता टी-२० विश्वचषकापूर्वी त्याने फिटनेस परत मिळवला असून सराव सामन्यात त्याने आपला फिटनेस आणि फॉर्म दोन्ही सिद्ध केले.

भारताने दिलेल्या २३९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिका संघाची सुरुवात चांगली झाली, पण रवी बिश्नोईने मोनांक पटेलला क्लीन बोल्ड करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. अँड्रियू अॅगसने ३१ चेंडूत पाच चौकार व एका षटकारासह ४४ धावांची खेळी केली, तर साईतेजा मुक्कामल्ला शून्यावर परतला. मिलिंद कुमार १८ धावा करत बाद झाला. त्याचा तिलक वर्माने कमालीचा रनिंग झेल टिपला. संजय कृष्णमूर्तीने १८ चेंडूत दोन चौकार व चार षटकारांसह ४१ धावा केल्या. हरमीत सिंग नऊ चेंडूत २५ धावा करून बाद झाला.

तत्पूर्वी भारताच्या अ संघाने फलंदाजीत वादळी कामगिरी केली. अमेरिकेने नाणेफेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केले होते. भारताकडून प्रियांश आर्य व एन जगदीशनची जोडी सलामीला उतरली. त्यांनी संघाला शानदार सुरुवात करून देत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. प्रियांशने १३ चेंडूत तीन चौकार व दोन षटकारांसह २८ धावा केल्या. जगदीशनने ५५ चेंडूत ११ चौकार व चार षटकारांसह १०४ धावांची शतकी खेळी केली. यानंतर तिलक वर्माने २४ चेंडूत तीन चौकार व दोन षटकारांसह ३८ धावा केल्या. कर्णधार आयुष बदोनीने २६ चेंडूत सहा चौकार व चार षटकारांसह ६० धावांची नाबाद खेळी केली.

# पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्राचा दबदबा



**पाली : प्रतिनिधी**

देहरादून (उत्तराखंड) येथे तिसऱ्या ऑल इंडिया पिंच्याक सिलॅट चॅम्पियनशिप २०२६चे आयोजन सर्व वयोगटातील मुला-मुलींसाठी करण्यात आले होते. महाराष्ट्र संघाने १० सुवर्ण, १९ रौप्य, १७ कांस्य अशी एकूण ४६ पदके जिंकून स्पर्धेत दबदबा निर्माण केला.

या स्पर्धेत ३० राज्य, सात केंद्रशासित प्रदेश तसेच पॅरामिलिटरी फॉर्सेस अशा मिळून १२६० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. विजयी खेळाडूंना उत्तराखंडच्या क्रीडामंत्री रेखा आर्या, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन अध्यक्ष किशोर येवले, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे सीईओ मोहम्मद इकबाल, उत्तराखंड पिंच्याक सिलॅट असोसिएशनचे सेक्रेटरी बबलू दिवाकर यांच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र संघासाठी अमोल कदम, नागेश बनसोडे, आकाश तिजारे, क्षितिज मोरे यांनी संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापकाची भूमिका बजावली. पंच म्हणून पोर्णिमा तेली, तृप्ती बनसोडे, सोनाली मुबरकर, ओमकार सानप यांनी काम पाहिले. महाराष्ट्र संघातील विजय खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.



# आंतरशालेय रस्सीखेच स्पर्धेत 'सीकेटी'चा संघ उपविजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड सायन्स खारघर येथे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सोमवारी (दि.२) आंतरशालेय व महाविद्यालयीन (खुल्या) स्तरावर अमृतचषक रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिकविद्यालयातील १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सीकेटीच्या संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


# खारघर येथे शौर्यम वॉकेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मार्कोस वेटरन फाऊंडेशनतर्फे 'गौरवाच्या पाऊलखुणा' या थीम वर आधारित शौर्यम वॉकेथॉन खारघर येथे ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही पाच किमीची वॉकेथॉन सर्वासाठी खुली आहे.

भारतीय नौदलाचे मरीन कमांडोज हे जगातील सर्वात श्रेष्ठ कमांडोज मानले जातात. शौर्यम वॉकेथॉनमध्ये सर्व सामान्य नागरिकांना निवृत्त मरीन कमांडोज तसेच नौदलात कार्यरत असणाऱ्या मरीन कमांडोजसोबत चालण्याची आणि संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. शौर्यम वॉकेथॉन ८ फेब्रुवारीला सकाळी ७ वाजता खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजपासून सुरू होणार आहे. इच्छुकांनी यामध्ये सहभागी व्हावे. सर्व स्पर्धकांना खास डिझाईन केलेले मार्कोस टी-शर्ट देण्यात येतील. शौर्यम वॉकेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी https://forms.gle/hLbDbYRt-kDQw5S१८ या लिंकवर आपले नाव रजिस्टर करावे, असे आवाहन मार्कोस वेटरन फाऊंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

# टॉम रॉजर्सने टिपला अफलातून झेल



**सिडनी : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या मैदानात अनेकदा असे काही क्षण पहायला मिळतात, जे पाहून डोळ्यांवर विश्वास बसत नाही. असाच एक चित्तथरारक झेल ऑस्ट्रेलियाच्या वनडे कपमध्ये पहायला मिळाला. व्हिक्टोरियाच्या टॉम रॉजर्सने क्वीन्सलँडचा कर्णधार मार्नस लाबुशेनचा एक हाताने हवेत झेप घेत घेतलेला झेल सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे.

क्वीन्सलँडच्या डावातील सहाव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर लाबुशेनने एक जोरदार शॉट खेळला. चेंडू अत्यंत वेगाने सीमारेषेकडे जात होता, मात्र तिथे तैनात असलेल्या टॉम रॉजर्सने आपल्या डाव्या बाजूला हवेत मोठी झेप घेतली आणि चक्क एका हाताने चेंडू टिपला. हा चेंडू इतका वेगवान होता की लाबुशेनसह मैदानावरील सर्व खेळाडू झेल पाहून अवाक् झाले. या अप्रतिम झेलमुळे मार्नस लाबुशेन अवघ्या ४ धावांवर (९ चेंडू) माघारी परतला. या झेलचा व्हिडिओ cricket.com.auने शेअर केला असून चाहत्यांनी टॉम रॉजर्सच्या या चपळाईचे भरभरून कौतुक केले आहे.

लाबुशेनच्या विकेटमुळे क्वीन्सलँडची स्थिती १७ धावांवर ३ बाद अशी बिकट झाली होती. या झेलसह टॉम रॉजर्सने आपल्या लिस्ट-ए क्रिकेट कारकिर्दीतील १० झेल पूर्ण केले. त्याने २०२३मध्ये आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली होती.

दरम्यान, क्वीन्सलँडचा संघ ४९ षटकांत २१५ धावांवर गारद झाला. त्यांच्याकडून जिमी पीअर्सनने सर्वाधिक ६५ धावा केल्या. व्हिक्टोरियाकडून फिरकीपटू टॉड मर्फीने १० षटकांत २९ धावा देऊन तीन बळी घेतले. त्यामुळे व्हिक्टोरियासमोर विजयासाठी २१६ धावांचे माफक लक्ष्य उभे राहिले.

# अंडर १९ वर्ल्डकपमध्ये आज भारत-अफगाणिस्तान सेमीफायनल

**हरारे : वृत्तसंस्था**

आयसीसी अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात आहे. स्पर्धेतील भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात होणारा सेमी फायनलचा सामना ४ फेब्रुवारीला हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर खेळवला जाणार आहे.

स्पर्धेतील सुपर ६ फेरीतील सामन्यात भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर एकतर्फी विजयाची नोंद केली. या विजयासह भारतीय संघाने स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश केला आहे.

भारतीय संघाने गेल्या वेळीदेखील स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला होता. त्या सामन्यात भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला होता, पण यावेळी आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ तुफान फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे भारतीय संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे.

सामना भारतीय वेळेनुसार दुपारी १ वाजता सुरू होईल, तर नाणेफेक १२.३० वाजता होईल. हा सामना तुम्ही स्टार स्पोर्ट्सवर लाईव्ह पाहू शकता. यासह तुम्ही या सामन्याचे लाईव्ह स्ट्रिमिंग जियो हॉटस्टारवर लाईव्ह पाहू शकता.

# भारताविरुद्ध सामना न खेळण्यावरून आयसीसीचा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला गंभीर इशारा

**दुबई : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक अवघ्या काही दिवसांवर आलेला असताना पाकिस्तान सरकारने मोठा निर्णय घेत आपल्या संघाला १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणाऱ्या भारताविरुद्धच्या साखळी सामन्यात खेळू नये, असे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे स्पर्धेच्या योजनांमध्ये अडथळा निर्माण झाला आहे आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) त्यावर नाराज आहे. आयसीसीने गंभीर परिणामांचा इशारा दिला असून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला (पीसीबी) त्यांच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगितले आहे.




पाकिस्तान सरकारने एका निवेदनात म्हटले, पाकिस्तान सरकार आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६मध्ये सहभागी होण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट संघाला मंजुरी देते, मात्र १५ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्ध नियोजित सामन्यात पाकिस्तान संघ मैदानात उतरणार नाही. हा निर्णय संघ श्रीलंकेला रवाना होण्याच्या काही तास आधी घेण्यात आला. ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी पाकिस्तान संघ संपूर्ण कालावधीत श्रीलंकेतच असणार आहे.

दरम्यान, पीसीबीने अद्याप या निर्णयाची अधिकृत माहिती आयसीसीला दिलेली नाही, मात्र सायंकाळी जारी केलेल्या निवेदनात आयसीसीने इशारा देत म्हटले की, एका संघाविरुद्धच्या सामन्यावर बहिष्काराच्या सोयीस्कर वागण्यामुळे खेळभावनेला ठेच पोहचते आणि स्पर्धेचे निकोप वातावरणही बिघडते. पीसीबीकडून अधिकृत पत्रव्यवहाराची प्रतीक्षा असतानाही निवडक सहभागाची ही भूमिका जागतिक क्रीडा स्पर्धेच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत नाही. पात्र ठरलेले सर्व संघ समान अटींवर स्पर्धेत सहभागी होतात हीच अशा स्पर्धेची संकल्पना आहे.

आयसीसीचे प्रमुख उद्दिष्ट पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाचे यशस्वी आयोजन आहे आणि त्याची जबाबदारी पीसीबीसह सर्व सदस्यांची आहे. त्यामुळे सर्व संबंधित घटकांचे हित जपेल असा परस्परसंमतीने तोडगा काढण्याचा मार्ग पीसीबीने शोधावा, अशी अपेक्षा आयसीसीने व्यक्त करत आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

### दीर्घकालीन परिणाम लक्षात घ्या!

***आयसीसीने पुढे म्हटले की, या निर्णयाचे पाकिस्तानमधील क्रिकेटवर होणारे दीर्घकालीन परिणाम पीसीबीने लक्षात घ्यावेत अशी अपेक्षा आहे, कारण याचा परिणाम जागतिक क्रिकेट व्यवस्थेवरही होऊ शकतो, ज्याचा पीसीबी स्वतः सदस्य आहे. राष्ट्रीय धोरणांमध्ये सरकारची भूमिका आयसीसी मान्य करते, मात्र हा निर्णय जागतिक क्रिकेट किंवा जगभरातील चाहत्यांच्या हिताचा नाही.***



# वीर वाजेकर महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात सन २०२५-२६च्या वार्षिक क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन जेएनपीएचे विश्वस्त रवींद्र पाटील यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर, कार्याध्यक्ष डॉ. श्रेया पाटील, महाविद्यालयातील उपप्राचार्य, प्राध्यापक व सेवक उपस्थित होते.

या वेळी आपल्या मनोगतात जेएनपीएचे विश्वस्त रवींद्र पाटील यांनी खेळ हा मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून खेळाडूंनी स्पर्धेदरम्यान खिलाडूवृत्ती जोपासावी, असे आवाहन केले.

स्पर्धेचे नियोजन क्रीडा संचालक प्रा.देवेंद्र कांबळे यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. स्पर्धेत कबड्डी, क्रिकेट, भालाफेक, थाळीफेक, लांब उडी, धावणे, बुद्धिबळ इत्यादी खेळांचा समावेश होता. त्यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# ...म्हणून पॅट कमिन्सची टी-२० वर्ल्डकपमधून माघार

**सिडनी : वृत्तसंस्था**

आयसीसी टी -२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी सर्व संघांनी आपले संघ जाहीर केले आहेत, पण ऑस्ट्रेलियाचा वर्ल्डकप विजेता कर्णधार पॅट कमिन्सने ही स्पर्धा खेळण्यास नकार दिला आहे. दरम्यान, कमिन्सने ही स्पर्धा न खेळण्यामागचे खरे कारण सांगितले आहे.



पॅट कमिन्स हा ऑस्ट्रेलियाच्या वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार आहे. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठीही कमिन्सला संघात स्थान मिळणार होते, पण त्याने स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. दुखापतीमुळे संघाबाहेर झालेल्या पॅट कमिन्सच्या जागी झ्वार्शुइसला संघात स्थान देण्यात आले आहे.

गेल्या वर्षी वेस्ट इंडिज दौऱ्यावर असताना कमिन्सला दुखापत झाली होती. तो इंग्लंडविरुद्धच्या अॅशेस मालिकेत खेळण्यासाठी मैदानात उतरला होता, पण मालिकेतील शेवटच्या दोन सामन्यात त्याला विश्रांती देण्यात आली होती. त्याला दुखापतीतून सावरण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून हा निर्णय घेण्यात आला होता, मात्र तो पूर्णपणे ठीक झाला नसल्याने त्याने स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला.

पॅट कमिन्सने म्हटले की, खरोखरच दुर्दैवी आहे. मला स्वतःला खेळण्यासाठी शारीरिकदृष्ट्या ठीक वाटत होते, पण दुखापतीतून सावरण्यासाठी वेळ कमी पडला. आता काही आठवडे पूर्ण विश्रांती घेणे गरजेचे आहे. सुरुवातीला मला वाटले होते की, पूर्णपणे ठीक होण्यासाठी चार आठवड्यांचा वेळ पुरेसा असेल, पण स्कॅन केल्यानंतर कळाले पूर्णपणे ठीक होण्यासाठी आणखी वेळ लागणार आहे.

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेनंतरही ऑस्ट्रेलिया संघाचे वेळापत्रक व्यस्त आहे. ऑगस्ट महिन्यात ऑस्ट्रेलियाचा सामना बांगलादेशविरुद्ध होणार आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर जाणार आहे. २०२७मध्ये ऑस्ट्रेलियाचा संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. त्यानंतर मेलबर्नच्या मैदानावर १५०वा डे नाईट कसोटी सामना, अॅशेस मालिका आणि आयसीसी टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेची फायनलदेखील होणार आहे. कसोटी क्रिकेटला प्राधान्य देण्यासाठी कमिन्सने टी-२० वर्ल्डकपमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# भारताविरुद्धचा सामना रद्द करणे पीसीबीला पडणार महागात!

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धा सुरू होण्याआधी पाकिस्तानने भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकला आहे. पाकिस्तान आपल्या भूमिकेवर ठाम राहिला, तर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.



आयसीसीच्या स्पर्धांमध्ये सर्वाधिक कमाई करून देणारा कोणता सामना असेल, तर तो भारत-पाकिस्तान सामना आहे. या सामन्यातून आयसीसीला २५ करोड डॉलर म्हणजेच २२०० कोटी रुपयांहून अधिकची रक्कम मिळते. त्यामुळे जर पाकिस्तानने हा सामना खेळण्यास नकार दिला, तर मोठे नुकसान होऊ शकते.

भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आधी द्विपक्षीय मालिकांमध्येदेखील आमनेसामने येत होते, पण दोन्ही देशातील सीमांतर्गत वादांमुळे पाकिस्तानच्या खेळाडूंवर भारतात येण्यावर बंदी घालण्यात आली आहे. परिणामी दोन्ही संघ केवळ आयसीसीच्या स्पर्धांमध्ये आमनेसामने येत असतात तसेच दोन्ही देशातील सामने त्रयस्थ ठिकाणी खेळवण्यात येतात. म्हणूनच भारत आणि श्रीलंका यजमान असलेल्या यंदाच्या वर्ल्डकप स्पर्धेतील पाकिस्तानचे सामने श्रीलंकेतील कोलंबो खेळवले जाणार आहेत.

जर पाकिस्तानचा संघ आपल्या निर्णयावर अडून राहिला, तर पाकिस्तानी बोर्डाचे मोठे नुकसान होऊ शकते. माध्यमातील वृत्तानुसार सामना रद्द झाल्यास जाहिरातीमुळे होणारे नुकसान हे २०० ते २५० कोटींच्या घरात असणार आहे. या मोठ्या सामन्यादरम्यान १० सेकंदाच्या जाहिरातीची किमत ४० लाख रूपये इतकी असते. हा सामना न खेळणे पाकिस्तानला महागात पडू शकते. एका सामन्यासाठी होणारा खर्च हा २२०० कोटींहून अधिक आहे, तर पाकिस्तानची वर्षाची कमाई ३.५५ कोटी डॉलर इतकी आहे. त्यामुळे सामना रद्द करणे हे पीसीबीला परवडणारे नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com